मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर ❯❯ मुंबई, गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ वर्ष- २९ ❯ अंक - ९६ ❯❯ पाने- ८ आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ किंमत : ३ रुपये

## ट्रम्प यांच्यानंतर आता कमला हॅरिस यांच्या प्रचार कार्यालयावर गोळीबार

**वॉशिंग्टन:** अमेरिकन नागरिक आपल्या पुढील राष्ट्राध्यक्षांची निवड करण्यासाठी ५ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान करतील. खरं तर या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे.अशातच अमेरिकेत राजकीय हिंसाचार वाढत असल्याच्या काही घटना समोर येत आहेत. काही दिवसांपूर्वी माजी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. यानंतर आता अमेरिकेतील ॲरिझोना येथे डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्या प्रचार कार्यालयात गोळीबार झाला असल्याची माहिती समोर आली आहे.



## जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळावा यासाठी रस्त्यावर उतरु

पान ८



# या प्रकाराला एन्काऊंटर म्हणता येत नाही... चार पोलिसांना त्याला आवरता आलं नाही का?

## कोर्टाची ठाणे पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती

प्रतिनिधी
मुंबई

बदलापूर लैंगिक अत्याचारप्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटरमध्ये मृत्यू झाला. हे एन्काउंटर आता वादग्रस्त ठरले असून कोर्टानेही यावरून ताशेरे ओढले आहेत. एन्काउंटरचा संपूर्ण घटनाक्रमच संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. एवढंच नव्हे तर हे एन्काउंटर असूच शकत नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. याप्रकरणी आज सुनावणी झाली असून आता पुढची सुनावणी पुढच्या गुरुवारी होणार आहे.

**एवढा निष्काळजीपणा का?**
*गंभीर गुन्हा असलेल्या माणसाला घेऊन जात असताना एवढा निष्काळजीपणा का दाखवला. याबाबत नियमावली काय आहे? त्याच्या हाताला बेड्या होत्या का? असा सवालही न्यायमूर्तींनी विचारला. त्यावर सरकारी वकील वेनेगावकर म्हणाले, त्याच्या हाताला बेड्या होत्या. पण त्याने पाणी मागितलं.*

या सुनावणीत जखमी पोलिसाचे वैद्यकीय अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आदी पुरावे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

"पोलीस वाहनातून आरोपीला घेऊन जात असताना चार पोलीस अधिकाऱ्यांची गरज काय होती? यासाठी अतिरिक्त माणसांचा वापर झाला असं वाटत नाही का?" असा सवाल उच्च न्यायालयाने विचारला. तसंच, "त्याने हातातून पिस्तुल खेचून घेतली तेव्हा चार पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला रोखायला हवं होतं. चार पोलिसांना तो आवरता आला नाही का?" असाही प्रश्न न्यायालयाने विचारला. "अक्षयने तीन गोळ्या झाडल्या असं तुम्ही म्हणालात. एक गोळी पोलिसाला लागली. मग इतर दोन गोळ्या कुठे आहेत? आपण स्वसंरक्षणाकरता असा परिस्थिती पायावर किंवा हातावर गोळी मारतो. गोळी कुठे मारावी याचं प्रशिक्षण पोलिसांना दिलं जातं." अशाही प्रश्नांची सरबत्ती केली. त्यावर सरकारी वकिलांनी सांगितलं की, पोलिसांनी विचार केला नाही, त्यांनी घटनेवर तत्काळ प्रतिक्रिया दिली. "त्याने जेव्हा हातात पिस्तुल घेऊन कोणावर रोखली तेव्हा इतर अधिकाऱ्यांनी त्याला रोखलं का नाही. तो फार स्ट्राँग माणूस नव्हता. त्यामुळे हे स्वीकारणं कठीण आहे. हे एन्काउंटर असू शकत नाही", असंही न्यायमूर्ती म्हणाले. त्याने यापूर्वी कधी शस्त्र वापरली आहेत का? जर त्याने पिस्तुल लोड केली असं तुम्ही म्हणत असाल तर त्याने याआधी शस्त्र वापरली असतील, असंही न्यायमूर्तींनी विचारलं. त्यावर सरकारी वकील म्हणाले, त्याने पिस्तुल लोड केली नाही. झटापटीत पिस्तुल लोड झाली होती. त्याने याआधी कधीही शस्त्रे वापरली नाहीत.

## म ह त्वा चे

### जरांगेंचे उपोषण 9 व्या दिवशी स्थगित

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या 9 व्या दिवशी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाच्या वतीने मला उपोषण न करण्याचा आग्रह करण्यात आला होता. माझ्या माय माऊल्यांनी त्यासाठी मला वारंवार विनंती केली. त्यामुळे आपण उपोषण स्थगित करत असल्याचे मनोज जणांनी पाटील यांनी सांगितले आहे. इतकेच नाही तर ज्यांनी - ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला, त्यांना सोडणार नाही, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला. राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज एकच असल्याचा दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. या निमित्ताने मराठा समाज एकत्र आला, हे एक चांगले झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

सविस्तर वृत्त पान 6 वर

### पंतप्रधानांनी घेतली चेस ऑलिम्पियाड विजेत्यांची भेट



**नवी दिल्ली :** आज पीएम मोदींनी चेस ऑलिम्पियाडमध्ये भारतासाठी सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूंची भेट घेतली. ऑलिम्पियाडच्या 97 वर्षांच्या इतिहासात भारताने प्रथमच ओपन आणि महिला अशा दोन्ही प्रकारात सुवर्णपदक जिंकले आहे. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ बुधवारी सायंकाळी 7 वाजता दिल्लीत खेळाडूंचा गौरव झाला. भारतीय महिला संघात डी हरिका, वैशाली रमेशबाबू, दिव्या देशमुख, तानिया सचदेवा आणि वंतिका अग्रवाल यांचा समावेश होता. तर पुरुष संघातून डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगेसी, विदित गुजराती आणि हरिकृष्ण पंताला पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी पोहोचले.

### जम्मू-काश्मीरमध्ये दुसऱ्या टप्प्यात 54.11% मतदान

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात 6 जिल्ह्यांतील 26 विधानसभा जागांवर मतदान संपले आहे. यामध्ये 25.78 लाख मतदारांनी सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदान केले.सायंकाळी 7 वाजेपर्यंत 54.11 टक्के मतदान झाले. रियासीमध्ये सर्वाधिक 71.81% मतदान झाले, तर श्रीनगरमध्ये सर्वात कमी 27.37% मतदान झाले.

# दिव्यांगांचा भरपावसात मंत्रालयासमोर एल्गार

## आकाशवाणी आमदार निवासही सोडला दणाणून



प्रतिनिधी
मुंबई

दिव्यांग कल्याण मंत्रालय प्रमुख प्रहार दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांगांच्या विविध प्रश्नावर मुंबईत मंत्रालयावर आंदोलन आले. या आंदोलकांनी आकाशवाणी आमदार निवासस्थानाचा ताबा घेतला. त्यानंतर ते इमारतीच्या टेरेसवर पोहोचले. या घटनेमुळे या ठिकाणी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन देण्यात यावे, दिव्यांगांना घरकुल देण्यात यावे, दिव्यांगांची कर्जमाफी झालीच पाहिजे, दिव्यांगांना व्यवसायासाठी गाळा आणि जागा मिळालीच पाहिजे यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी दिव्यांग बांधवांच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. राज्यभरातून आलेल्या दिव्यांगांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे.

दिव्यांग कल्याण मंत्रालय प्रमुख प्रहार दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी एक वाजता आंदोलकांनी मंत्रालयासमोर पोहोचण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले होते. मात्र, आंदोलक आधीच या परिसरात दाखल झाले. त्यांनी थेट येथील आमदार निवासामध्ये घुसत त्याचा ताबा घेतला. नंतर हे आंदोलक टेरेसवर दाखल झाले आणि आंदोलन सुरु केले. या वेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. स्वतः बच्चू कडूही या आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी भरपावसात आंदोलकांसोबत आंदोलन केले. यावेळी मंत्री अब्दुल सत्तार यांनीही आंदोलकांना भेट देऊन त्यांच्याशी सल्लामसलत केली.

# राज्यातलं सरकार बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही - शरद पवार

प्रतिनिधी
परळी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्याराष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याची इच्छा अनेकांनी बोलून दाखवली आहे. भाजपासह महायुतीतील अनेक नेत्यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला असून, परळी तालुक्यातील सक्रिय कार्यकर्ते राजेभाऊ फड यांनी आज शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. यावेळी राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार शरद पवारांनी बोलून दाखवला.



राष्ट्रवादीतील फुटीनंतर परळीचे आमदार असलेल्या धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ दिली. त्यामुळे या मतदारसंघात शरद पवार हे नवीन चेहऱ्याच्या शोधात असून इतर पक्षातील नेत्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर राजेभाऊ फड यांना पक्षात घेत शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. राजेभाऊ फड हे कन्हेरवाडी गावचे सरपंच आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतर्फे निवडणूक लढवण्यास ते इच्छुक आहेत, असे म्हटले जात आहे. यातच राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार शरद पवारांनी बोलून दाखवला आहे.

सत्ता लोकांसाठी वापरायची असते, तुमच्या भागात सत्तेचा दुरुपयोग केला जातो. त्यावर कोणी आवाज उठवतो, पान 8 वर

# पंतप्रधान मोदींनी स्पष्टीकरण द्यावे!

प्रतिनिधी
श्रीनगर



केंद्र सरकराने तीन कृषी कायदे मागे घेतले होते, हे कायदे पुन्हा लागू करावेत अशी मागणी भाजप खासदार कंगना रनौतने केली आहे. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्टीकरण द्यावे असे आव्हान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले आहे.

राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करून म्हटले आहे की, भाजपच्या एका खासदाराने तीन काळे कृषी कायदे परत आणण्याची मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या मागणीशी सहमत आहेत का? की परत बदमाशी करत आहेत.? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यावर स्पष्टीकरण द्यावे. जर हे कायदे परत आणले तर इंडिया आघाडी याचा विरोध करणार. या आंदोलनात 700 लोक शहीद झाले होते, मोदींनी त्यांना दोन मिनिटं श्रद्धांजली सुद्धा वाहू दिली नाही असेही राहुल गांधी म्हणाले.

# परतीच्या पावसाने मुंबई, पुणे आणि कोकणाला झोडपले

## मुंबई उपनगरांमधील रस्त्यांवर साचले पाणी




प्रतिनिधी
मुंबई

मुंबईत दुपारपासूनच जोरदार परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे. काही मिनिटांच्या विश्रांतीनंतर पाऊस जोर धरत असल्याकारणाने मुंबईतील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. परतीच्या पावसाने मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि पालघरमध्ये धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे अंधेरीतील सबवे देखील पाण्याखाली गेला असून रस्ते वाहतुकीवर याचा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे.

मुंबईत अनेक ठिकाणी अतिमुसधार पाऊस कोसळत आहे. सायंकाळी 05 वाजेच्या दरम्यान मुंबईत काळाकुट्ट अंधार पडल्याने रात्राचे 8-9 वाजल्याचा भास मुंबईकरांना झाला. परंतु, त्यानंतर सुरू झालेल्या पावसाने दोन तासांपासून जोरदार बॅटिंग सुरू केली आहे. त्यामुळे नेमक्या कामावरून घरी जाण्याच्या वेळीच पावसाने जोर धरल्याने नोकरदार वर्गाचे हाल झाले. या मुसळधार पावसाचा परिणाम रस्ते वाहतुकीवर झाला असून यामुळे पश्चिम आणि पूर्व या दोन्ही द्रुतगती महामार्गावरील वाहतूक संथ गतीने सुरू होती. कांजूरमार्ग, भांडूप आणि मुलुंड येथील रस्त्यांवर पाणी साचल्याने नद्यांचे रुप आले आहे. हवामान विभागाने मुंबई, ठाण्यासह पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्याला आज बुधवारी (ता. 25 सप्टेंबर) रेड अलर्ट म्हणजेच अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज गुरूवार दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी सुटी जाहीर करण्यात येत आहे.आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**कुठे किती पाऊस**
*सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजे पर्यंत शहर: 8.30 मिमी, पूर्व उपनगरात : 28.31 मिमी, पश्चिम उपनगरात : 8.11 मिमी इतका पाऊस झाल्याची नोंद झाली तर संधुस्कली ६ ते ७ वाजेपर्यतच्या एका तासात शहर भागात पालिका मुख्यालय परिसरात 40 मिमी, कुलाबा पंपिंग स्टेशन आणि ए वॉर्ड ऑफिस-37 मिमी, वडाळा फायर स्टेशन आणि डी वॉर्ड ऑफिस-31 मिमी, ब प्रभाग कार्यालय, भायखळा फायर स्टेशन आणि नायर हॉस्पिटल-28 मिमी*

# मला मुख्यमंत्री व्हायचंय, पण गाडी पुढे सरकतच नाही

प्रतिनिधी
मुंबई



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुख्यमंत्री होण्याची इच्छा पुन्हा एकदा उफाळून आली आहे. माझी मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे, पण माझी गाडी उपमुख्यमंत्रीपदाहून पुढे सरकतच नाही, मग मी काय करू, असे ते बुधवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. सध्या सत्ताधारी महायुती व विरोधकांच्या महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी उपरोक्त विधान केले आहे. ते बुधवारी इंडिया टुडे कॉन्क्लेव्हमध्ये बोलताना म्हणाले की, माझी मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे. पण माझी गाडी उपमुख्यमंत्री पदावरच जावून थांबते. मी काय करू? महायुती सरकारमध्ये जाताना मी भाजपच्या दिल्लीतील नेत्यांशी चर्चा केली होती. यात जे पी नड्डा, अमित शहा, नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांचा समावेश होता. आता इतर लोक काय म्हणत आहेत, त्याचे मला काहीही देणेघेणे नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आगामी विधानसभा निवडणूक महायुतीचा घटकपक्ष म्हणूनच लढवेल.

# महाराष्ट्राबाहेरील बाजारबुणग्यांनी आम्हाला खतम करण्याची भाषा करू नये

प्रतिनिधी
मुंबई

आगामी विधानसभा निवडणूक नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळं महायुती आणि महाविकास आघाडीसह सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केलीय. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी मंगळवारी (24 सप्टेंबर) नागपूरमध्ये असताना शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर टीका केली होती. त्यांनी केलेल्या टिकेवर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलय.



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत आज त्यांच्या मातोश्री निवासस्थानी काही नेत्यांनी पक्षात प्रवेश केला. भाजपाचे नेते आणि माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून शिवबंधन बांधून शिवसेना (उद्धव ठाकरे गट) पक्षात प्रवेश केला. यावेळी बोलताना त्यांनी अमित शाह यांना टोला लगावला.

### लोकसभेतील पराभवाचा डाग पुसून टाका



***नाशिक :*** *नाशिक -महाराष्ट्रातील 2024 ची निवडणूक ही वैचारिक लढाई आहे. एक कार्यकर्ता म्हणून एक संकल्प घेऊन पक्षाचे काम करा. लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळाल्याचा ठपका पुसून टाका. त्यांच्याकडून आपला आत्मविश्वास खचवला जात आहे. जोशात नाही तर धैर्याने निवडणुकीला सामोरे जा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले आहे.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरू आहे.* पान 8 वर

# उद्योग, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रतिनिधी
मुंबई

उद्योग, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणूक क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर आहे. राज्यात सेमी कंडक्टर तसेच इतर सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. उद्योगांना मिळणारी सुविधा, पायाभूत सुविधा यामुळे महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य बनल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.




इंडिया टुडे कॉनक्लेव्ह 2024 मध्ये मुख्यमंत्री शिंदे सहभागी झाले होते. यावेळी शिंदे यांची मुलाखत झाली. दावोसमध्ये सुमारे पाच लाख कोटींची गुंतवणूक झाली. याशिवाय सौर ऊर्जा, सेमी कंडक्टर आदी क्षेत्रात राज्यात गुंतवणूक वाढत आहे. नुकतेच नवी मुंबईत सेमी कंडक्टरचा प्रकल्प सुरू झाला आहे. उद्योजकांचा विश्वास वाढल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण झाल्या आहेत. अटल सेतू, सागरी किनारा मार्ग यामुळे प्रवासाचा वेळ कमी झाला. मेट्रोचे जाळे विणले जात असून लवकरच मेट्रो 3 या भूमिगत मेट्रोचा शुभारंभ होणार आहे. यातून रोज सुमारे 13 लाख नागरिक प्रवास करतील. वाढवण बंदर महाराष्ट्राचा कायापालट करणारा प्रकल्प आहे. वाढवण येथे विमानतळ सुरू करण्याचाही विचार आहे. नवी मुंबई विमानतळही लवकरच सुरू होणार आहे. पुढील दोन वर्षात मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा निर्धार आहे. तसेच राज्यातील रस्तेही खड्डेमुक्त करण्यासाठी काम करत आहोत, असे श्री. शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, हे सर्वसामान्यांचे शासन असल्यामुळे सर्वसामान्यांसाठी मुख्यमंत्री – माझी लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. या योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आली असून ही योजना पुढील काळातही सुरूच राहणार आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मुख्यमंत्री – माझी लाडकी बहिण योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनांचा हातभार लागणार आहे. या योजनांचा फायदा सर्वसामान्यांच्या कुटुंबियांना होणार आहे. शासन आपल्या दारी योजनेमुळे सुमारे पाच कोटी नागरिकांना फायदा झाला आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, गेल्या दोन वर्षात राज्यात पूर्ण क्षमतेने विकास होत आहे. 'वर्षा' शासकीय निवासस्थानी व मंत्रालयात येणाऱ्यांना भेटल्याशिवाय मी जात नाही. जनता हीच माझ्यासाठी ऊर्जा आहे. सीएम म्हणजे कॉमन मॅन असं समजून मी काम करतो. त्यामुळे सामान्य माणसाच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी काम करत आहे. पान 8 वर

# जव्हार उरुस दर्शनाला पालघर एस. पी.पाटील

**जव्हार :** ५७२ वर्षांची परंपरा लाभलेल्या जव्हार शहरातील संस्थानकालिन हिंदू , मुस्लिम बांधवांचा सामाजिक ऐक्य जपणाऱ्या उरुस या उत्सवाला पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक, बाळासाहेब पाटील (आय.पी.एस.)यांनी बुधवारी सकाळी ११ वाजता आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत दर्शन घेवून सबंध जव्हार वासियांना उरुस निमित्त शुभेच्छा दिल्या. जव्हार चा उरुस हा सर्वदूर प्रसिद्ध आहे, या उत्सवाला पर राज्यातून देखील भाविक येत असतात, या सामाजिक सलोखा जपणाऱ्या उत्सवाची महती ऐकण्यात होती, परंतु आज प्रत्यक्षात दर्शन घेवून प्रार्थना करून स्वतः अनुभव घेतला, जव्हार शहरातील नागरिकांनी या उत्सवाचे अतिशय सुंदर नियोजन केले असल्याचे या वेळी पाटील यांनी सांगितले, तर पिढीजात परंपरा बाबत येथील व्यावसायिक नरुशेठ तेंडुलकर यांनी या उत्सवाची सुरुवात, प्रथा सांगत या संस्थानकालीन उत्सवाची माहिती दिली. या वेळी जव्हार शहरातील सर्व पक्षीय मंडळी, उत्सव प्रेमी , पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



## थोडक्यात

### वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या 75 हजार जागा वाढणार

**मुंबई :** वैद्यकीय व्यावसायिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन केंद्र सरकारने वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत दरवर्षी १५ हजारांनी वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत देशात ७५ हजार वैद्यकीय जागा वाढवण्यात येणार असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी नुकतेच जाहीर केले.यंदा झालेल्या नीट यूजी परीक्षेसाठी देशभरातून २४ लाख ६ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परंतु वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागा फारच अपुऱ्या आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रवेशापासून वंचित राहावे लागत आहे.

### मुंबई विद्यापीठ परिसरात पूर्वपरवानगीशिवाय आंदोलनास बंदी

**मुंबई:** परीक्षेसंबंधित गोंधळ आणि नोंदणीकृत पदवीधर गटाच्या अधिसभा निवडणुकीतील विविध मुद्द्यांवरून चर्चेत असलेले मुंबई विद्यापीठ आंदोलनासंदर्भातील परिपत्रकामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकण्याची चिन्हे आहेत. यापुढे मुंबई विद्यापीठाच्या परिसरात संघटनांना किंवा व्यक्तीस कोणत्याही स्वरुपाच्या सभा, आंदोलने, मोर्चा, उपोषण, निषेध मोर्चा, बैठका व तत्सम कोणत्याही कार्यक्रमाचे पूर्वपरवानगीशिवाय आयोजन करता येणार नाही. नुकत्याच झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या ठरावाला मंजुरी देण्यात आली. मुंबई विद्यापीठ प्रशासनाने या संदर्भातील परिपत्रक जारी केल्यानंतर त्याचा विद्यार्थी संघटनांनी तीव्र निषेध केला असून विद्यार्थ्यांमध्येही नाराजी पसरली आहे. तसेच हे परिपत्रक तात्काळ मागे घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### भायखळ्यात रंगणार 'होम मिनिस्टर' कार्यक्रम

**मुंबई :** शिवसेना भायखळा विधानसभेचे आमदार यामिनी यशवंत जाधव यांच्या सौजन्याने शुक्रवार दिनांक 27 सप्टेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजता बाटलीबॉय कंपाऊंड, फेरबंदर, भायखळा पूर्व येथे महिलांसाठी होम मिनिस्टर या आवडत्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अनेक बक्षिसे देखील ठेवण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे या कार्यक्रमाला मुख्य सूत्रसंचालन करण्यासाठी प्रसिद्ध मराठी अभिनेते दिगंबर नाईक उपस्थित राहणार आहेत. सर्व सहभागी महिलांना एक विशेष पारितोषिक देखील देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त महिलांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेनेचे भायखळा विधानसभेच्या आमदार यामिनी जाधव यांनी केले आहे. या कार्यक्रमात सहभाग घेण्यासाठी स्थानिक शिवसेना शाखेत संपर्क साधावा.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# आगामी विधानसभा निवडणूक ठरणार लक्षवेधी; राजकीय जुळवाजुळवीला वेग

**प्रतिनिधी**
■ **वसई**

आगामी विधानसभा निवडणूक जिंकून सत्ता काबीज करण्यासाठी राजकीय डावपेच आखण्याला भलताच वेग आला आहे. याच धर्तीवर लोकसभेत मोठा विजय मिळवलेल्या पालघर जिल्ह्यावर आता महायुतीने चांगलेच लक्ष वेधले आहे. नालासोपारा व बोईसर या मतदारसंघावर महायुती दावा करणार असून येथे अनपेक्षित उमेदवार रणांगणात उतरविण्याची हालचाल महायुतीकडून सुरू असल्याचे समजते. तसेच अशाच पद्धतीचे डावपेच महाविकास आघाडीकडून देखील राजकीय पटलावर वापरले जाण्याची शक्यता आहे. तूर्तास निवडणुकीच्या पूर्वसंध्येला राजकीय जुळवाजुळवीला भलताच वेग आला आहे, हे मात्र खरे

एका माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीत भाजप व शिंदे गटाने समसमान यश मिळवले आहे त्यामुळे शिंदे गट आता भाजपच्या राजकीय दबावाला बळी न पडता स्वतःचे डावपेच आखणार, असे एकंदर चित्र आहे. याआधी शिवसेनेने वसई, नालासोपारा व बोईसर हे तिन्ही विधानसभा मतदारसंघ लढवले आहेत. त्यामुळे हे तिन्ही मतदार संघ शिंदे गटच लढवणार असे संकेत शिंदे गटाने दिले आहेत. तसेच शिंदे गटाने

नुकतेच येथे झालेल्या एका सभेत तसे संकेत दिले आहेत. दरम्यान, वसई, नालासोपारा व बोईसरमधील बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी महायुतीने व महाविकास आघाडीने कंबर कसली आहे. शिंदे गटाने तिन्ही मतदारसंघ लढवणार असल्याचे जरी म्हटले असेल तरी नालासोपारा व बोईसर मतदारसंघ आपणच लढवणार असे भाजप म्हणत आहे. त्यामुळे राजकीय घमासान पालघरमध्ये पाहायला मिळत आहे.

दुसऱ्या बाजूने पालघरमधील सहाही मतदारसंघांबाबत महाविकास आघाडीत समन्वय असून पालघरमधील तीन मतदारसंघ ठाकरे गट लढवणार आहे. यात नालासोपारा, बोईसर व पालघर विधानसभा मतदार संघांचा समावेश आहे. तर विक्रमगड शरद पवार गट, डहाणू माकप व वसई काँग्रेस लढवणार आहे. येथे महायुती व बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी अनपेक्षित उमेदवार मैदानात उतरविण्याची हालचाल महाविकास आघाडीकडून सुरू आहेत. तर बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर स्वतः मैदानात उतरून लोकसभेतील पराभवाचा बदला घेण्यासाठी सज्ज आहेत. ते आपली निवृत्ती मागे घेऊन पुन्हा रणांगणात उतरतील असा एक अंदाज आहे. विधानसभेची निवडणूक घोषित झाल्यानंतर पालघरमधील चित्र स्पष्ट होणार आहे.

# सावधान: शहरांचा श्वास कोंडतोय

## वाहतूककोंडी बनतेय भीषण समस्या

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसईचे नागरीकरण बेसुमार वाढू लागले आहे. वाढत्या विकासाबरोबरच गगनचुंबी इमारती उभ्या राहत आहेत. त्यात नागरीकरण वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्या देखील वाढू लागली आहे. वाढती वाहने सामावून घेणारे रस्ते मात्र तोकडे पडू लागल्याने वाहतूककोंडीचा ताण शहराला सोसावा लागत आहे. परिणामी शहरांचा श्वास कोंडू लागला आहे.

वसई -विरार शहर सध्या वाहतुकीच्या विळख्यात अडकले आहे. वाढत्या वाहनांचा भार सोसण्या इतकी क्षमता वसईच्या रस्त्यांत उरली नाही. मध्यंतरी महापालिकेने रस्त्यांच्या काँक्रीटीकरण कामाबाबत माहिती दिली होती. परंतु, त्यावर योग्य प्रक्रिया करण्यास पालिकेने प्रतिसाद दिलेला नाही. तसेच वसई -विरारमध्ये एमएमआरडीए प्रशासन १२ उड्डाणपूल उभारणार असल्याचा प्रस्ताव समोर आला होता. मात्र हा प्रस्ताव अद्याप कागदावरच असल्याचे दिसून येते.

वसईत वाहने बेसुमार वाढत चालली आहेत. अशा धर्तीवर वसईतील अतिक्रमणे हटवून आहेत ते रस्ते वाढवून वाहतुकीचे नियोजन करण्याबाबत महापालिका प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे. वसईत सध्या सकाळ, दुपार, संध्याकाळ वाहतुकीचा फज्जा उडत आहे.

भविष्यात वसईत वाहतुकीचा बोजवारा उडणार असून महापालिका व महानगर प्रशासनाने वसईतील रस्त्यांबाबत महत्वपूर्ण भूमिका घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# काँग्रेसला समर्पित व निष्ठावंत अशांनाचं विधानसभेचे तिकीट द्या - फरहान आझमी

■ **मुंबई**



मुंबई महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी जोरात सुरू केली आहे. तिकीट कापल्याचे पाहून अनेक नेते आपला पक्ष सोडून इतर पक्षात दाखल होत आहेत. अखिल भारतीय अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष फरहान आझमी यांनी काँग्रेस हायकमांडने पक्षाला समर्पित आणि निष्ठावान असलेल्या कार्यकर्त्यांना किंवा अधिकाऱ्यांनाच तिकीट द्यावे, असे आवाहन केले आहे. श्री आझमी म्हणाले की, इतर पक्षातील लोकांचे स्वागत आहे. मात्र पक्षातील निष्ठावंतांना बाजूला सारून अशा लोकांना तिकीट देऊ नये. त्यांना इतर जबाबदाऱ्या देण्यात याव्यात जेणेकरून पक्षाप्रती त्यांच्या भावनेचे आणि समर्पणाचे मूल्यमापन करता येईल. पॅराशूट उमेदवाराला तिकीट दिल्याने पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मनोबल खचते. फरहान आझमी म्हणाले की, उत्तर भारतीय बहुल भागात हिंदू-मुस्लिम असा भेदभाव न करता उत्तर भारतीयांना तिकीट देण्यात यावे, जेणेकरून उत्तर भारतीय संघटित होऊन काँग्रेसच्या बाजूने मतदान करू शकतील. तिकीट देताना स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे. जे लोक लोकांमध्ये सतत काम करत असतात, त्यांना लोकांमध्ये चांगली लोकप्रियता असते. वर्षानुवर्षे पक्षाशी प्रामाणिक आणि पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या, चांगल्या-वाईट काळात खांद्याला खांदा लावून उभे राहिलेल्या अशा लोकांना तिकीट दिल्याने कार्यकर्त्यांसह जनतेतही उत्साह दिसून येतो. आझमी म्हणाले की, महाराष्ट्रातील जनतेला परिवर्तन हवे आहे, मात्र त्यासाठी योग्य व्यक्तीला तिकीट देणे गरजेचे आहे.

*__मुंबई :__ जोगेश्वरी विधानसभा क्षेत्र, माजी नगरसेवक अनंत(बाळा) भि.नर,यांच्या माध्यमातून आणि शाखा क्र.७२ चे शाखाप्रमुख अमरनाथ मालवणकर यांच्या पाठपूराव्याने प्रभागातील नागरिकांना नुकतेच धान्य वाटप करण्यात आले. यावेळी विधानसभा संघटक विश्वनाथ सावंत, शाखाप्रमुख अमरनाथ मालवणकर, शाखासंघटक समिक्षा माळी, संजय सावंत(व्यापार वि.सरचिटणीस) विशाल येरागी(शाखासमन्वयक) उपशाखाप्रमुख उमेश राणे,सर्व उपशाखाप्रमुख, उपशाखासंघटक आदी उपस्थित होते.*



# जुचंद्र गाव धोक्याच्या वळणावर प्रकरण; गाव बचावासाठी तरुण सरसावले

**प्रतिनिधी**
■ **वसई**

नुकतेच २२ सप्टेंबरच्या अंकात नायगाव पूर्वेतील जुचंद्र गाव धोक्याच्या वळणावर असून आगरी संस्कृती व परंपरा धोक्यात आल्याबाबत वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर गावात ते सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चेचा विषय ठरला.

या वृत्ताने तरुणांच्या भावनेला हात घातल्याने गावातील तरुण वर्ग गावाच्या बचावासाठी पुढे सरसावले आहेत. गावातील तरुण एकदिलाने पुढे येऊन आगरी संस्कृती व परंपरा टिकवण्यासाठी लवकरच पक्षविरहित संघटना स्थापन करणार आहेत. या संघटनेच्या माध्यमातून तरुण गावाला भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेणार आहेत.

नायगाव पूर्वेकडील जुचंद्र गावाच्या आजूबाजूला अनधिकृत चाळींचा विळखा पडला आहे. यात परप्रांतीय नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्याला आले आहेत. त्यामुळे परप्रांतीय नागरिक 75 टक्के तर स्थानिक आगरी समाज केवळ 25 टक्के उरला असल्याचे भीषण वास्तव दिनांक २२ सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. या अंकात स्थानिक स्वार्थी नागरिकांच्या स्वार्थापायी जुचंद्र गाव धोक्याच्या वळणावर असल्याचे सांगण्यात आले होते.

## पक्षविरहित संघटना स्थापन करणार

परप्रांतीय नागरिकांच्या वाढत्या आलेखामुळे स्थानिक आगरी अस्मिता, संस्कृती, प्रथा, परंपरा झाकोळल्या जाऊ लागल्या आहेत. असे भीषण वास्तव दर्शविणारे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर गावातील तरुणांनी सामाजिक माध्यमांवर हे वृत्त जास्तीत जास्त प्रसारित करून आपल्या पुढील भविष्याबाबत चिंता व्यक्त केली.

या वृत्तानंतर स्थानिक आगरी तरुण आपली संस्कृती, परंपरा अबाधित ठेवण्यासाठी तसेच परप्रांतीयांच्या वाढत्या संख्येत जुचंद्र गावाचे कलाकारांचे गाव हे सातासमुद्रापार गेलेले नाव पुसले जाऊ नये यासाठी पुढे सरसावले आहेत. हे तरुण आपल्या गावाचे वैभव राखण्यासाठी पक्षविरहीत संघटनेची लवकरच स्थापना करणार असून या संघटनेच्या माध्यमातून गावाला वाचवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची आश्वासक माहिती मिळत आहे.

दरम्यान, एका वृत्तानंतर गावातील जाणकार व्यक्तींनी सदरचे वृत्त सोशल मीडियावर प्रसारित करून गावातील तरुणांना गावाच्या बचावासाठी आवाहन केल्यानंतर गावातील तरुण आपल्या गावासाठी पुढे आले आहेत.

# दप्तराचे ओझे कमीच होईना; बालवयातच पाठदुखीचे आजार

**प्रतिनिधी**
■ **जव्हार**

ग्रामीण भागातून जव्हार शहरात शाळेत येताना विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे अधिक असते, त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना पाठ दुखण्यासारखे आजार जडत आहेत,इंग्रजी शाळेत बालवाडी पासूनच विद्यार्थ्यांना निरनिराळे विषय असतात, त्यामुळे प्रत्येक विषयाची वही व पुस्तक आणि व्यवसाय सोबत आणावा लागतो, परिणामी दप्तराचे ओझे कमीच होईना आणि बालवयातच पाठदुखीचे आजार होऊ लागले असल्याने पालकांची चिंता वाढली आहे.

दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्य सरकारने अनेकदा घोषणा केल्या. त्यासाठी शालेय पातळीवर सूचनाही देण्यात आल्या. सरकारने पुस्तकांमध्येच वह्यांची पाने जोडून देण्यासह अनेक उपाययोजना राबवल्या, तर शाळांनीही त्यांच्या पातळीवर ओझे कमी करण्यासाठी अनेक प्रयोगही राबवले. मात्र, त्यात सातत्य नसल्याने उपाययोजना कागदावरच राहिल्या असून, वह्या पुस्तकांची संख्या वाढतच असल्याने दप्तराचे ओझे विद्यार्थ्यांच्या पाठीवर कायमच आहे. त्यातून अनेक विद्यार्थ्यांना पाठदुखीसारखे त्रास सुरू झाले आहेत. त्याकडे मात्र सर्वच पातळ्यांवर सोयीस्कररीत्या दुर्लक्षच होत असल्याचे चित्र आहे.

विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी सरकारने अनेक घोषणा केल्या आहेत. सध्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राज्यातील सर्व शाळांतील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी पाठ्यपुस्तके एकात्मिक स्वरूपात चार भागांमध्ये विभागून प्रत्येक पाठ,कवितेनंतर गरजेनुसार कोरी पाने समाविष्ट करावी, अशी अंमलबजावणी करण्याची सूचना केली. त्याचबरोबर त्यांनी प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र वह्या शाळेत आणण्याची आवश्यकता असू नये. पाठ्यपुस्तकात देण्यात आलेल्या पानांचा वापर विद्यार्थ्यांना करता येईल, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार त्याची कार्यवाही करण्यात आली. मात्र, त्यामध्ये सातत्य राहत नसल्याचे स्पष्ट होत आहे.



*__पाणीही न्यावे लागते घरूनच__*

*शाळेच्या वह्या-पुस्तकांच्या दप्तराबरोबरच त्यामध्ये पाण्याची बाटलीही त्यांना घरूनच घेऊन जावी लागते. त्यासाठी सरकारने विद्यार्थ्यांना शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, असे सुचवले होते. अनेक शाळांनी तशी व्यवस्थाही विद्यार्थ्यांसाठी केली आहे. मात्र, अनेक पालकांचे ते पाणी स्वच्छ आणि शुद्ध नसल्याचे मत असल्याने ते आपल्या पाल्यांना घरूनच पाण्याची बाटली भरून देतात. त्यामुळे त्या पाण्याच्या बाटलीचेही ओझे विद्यार्थ्यांना दप्तराबरोबर शाळेत न्यावे लागते.*

*__ओझ्यामुळे विद्यार्थ्यांना जडताहेत व्याधी__*

*प्रमाणापेक्षा अतिरिक्त वजनाचे दप्तर शाळेत घेऊन जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठदुखीचा त्रास, सांधे आखडणे, मणक्याची झीज होणे, मान दुखणे, स्नायू आखडणे, फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होणे, थकवा येणे, मानसिक ताण येणे, डोकेदुखी यासारखे आजार होऊ शकतात आणि बालवयात विद्यार्थ्यांच्या शरीरावर होणाऱ्या अनिष्ट परिणामांमुळे भविष्यातही त्यांना अनेक शारीरिक, मानसिक व्याधी जडू शकतात, असे शासनाच्या शिक्षण विभागाने केलेल्या पाहणीत दिसून आले. त्यावर उपाय म्हणून विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी कमी करणे, हा पर्याय पुढे आले. मात्र, त्यात सातत्य नसल्याने पुन्हा जैसे थे अशीच स्थिती निर्माण झाली आहे.*

*जव्हार शहर असो किंवा तालुक्यातील शाळांनी स्वच्छ पाणी दिले, तर विद्यार्थ्यांचे ओझे कमी होईल. त्यासाठी नगर परिषद, ग्रामपंचायतीने पिण्या योग्य पाणी दिले पाहिजे. शाळांनी दप्तरासाठी वापरल्या जाणाऱ्या बॅगांचे वजन कमी केले पाहिजे. त्यासाठी सरकारने एक ठराविक वजन ठरवून दिले पाहिजे. जेणे करून बाल वयात पाठीचे त्रास व्हायला नको. विद्यार्थ्यांनी तीन-तीन विषयाला मिळून एक वही नियोजन करून द्यावी.*

***-डॉ.सुरेश कुरबुडे, अस्थीरोग तज्ज्ञ, ठाणे***

*विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी शासनाने अनेक घोषणा केल्या. मात्र, त्याची अंमलबजावणीच होत नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात दप्तर शाळेत न्यावे लागते. त्यामुळे त्यांना पाठदुखीसारखे त्रास सुरू झाले आहेत. त्याचा शिक्षण विभागाने विचार करणे गरजेचे आहे.*

***-वर्षा मुकणे, जव्हार ,पालक***

# विलेपार्लेत अल्पवयीन भावंडांची चोर समजून धिंड, 4 जणांविरुद्ध गुन्हा

**मुंबई :** विलेपार्ले येथे दोन अल्पवयीन (१४ आणि १७ वर्ष) भावांना चोर समजून स्थानिकांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. चार ते पाच जणांनी दोघांना विवस्त्र करून केस कापले, त्यानंतर साखळीने बांधून परिसरात धिंड काढून त्याचे चित्रीकरण केले व ती चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसिद्ध केली. यातील आरोपींनी दोन्ही मुलांना रात्रभर बांधून होते. याप्रकरणी जुहू पोलिसांनी सूरज पटवा नावाच्या व्यक्तींसह तीन ते चार जणांविरुद्ध सोमवारी गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी जुहू पोलीस अधिक तपास करत आहेत.

**पब्लिक नोटीस**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे बोळींज, तालुका: वसई, जिल्हा : पालघर येथील **वृंदावन हाईट्स, सृष्टी कॉम्प्लेक्स, वृंदावन टाऊनशिप मधील शॉप नं. बी/०२. तळ मजला असा शॉपचा मे. काळे अँण्ड अगरवाल असोसिएट्स व श्री. भवरलाल के. चौधरी** यांचेमधील दिनांक **१३/०७/२००९** रोजीचा ओरिजनल करारनामा गहाळ झालेला आहे.

**श्री. भवरलाल के. चौधरी** यांनी दिनांक १५/०१/२०२० रोजीच्या कराराने सदर शॉप **श्री. किशोर श्रीकृष्ण चिंचरकर व श्री. प्रविप श्रीकृष्ण चिंचरकर** यांना कायमचा विक्री केलेला आहे, तरी सदर शॉपवर अगर त्याचे एखादया भागावर कोणत्याही बँकेचा, कोणत्याही वित्तीय संस्थेचा किंवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, पहिला मजला, कपाडीया हाऊस गावठण, विरार प., ता. वसई, जि. पालघर येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत सर्व कागदपत्रासहित लेखी कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

कळावे.

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील

**जाहीर सूचना**

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे विरार, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील मिळकत सर्व्हे क्रमांक २३७, हिस्सा क्रमांक ५अ/१, क्षेत्र ४१८ चौ.मी., ही मिळकत व त्यावर असलेली समता ही इमारत, माझे अशील समता सहकारी गृहनिर्माण संस्था लि, पत्ता- विरार (पुर्व), तालुका वसई, जिल्हा पालघर, ह्यांचे मालकीची आहे. सदर मिळकत पुर्नविकसीत करावयाची असुन त्या अनुषंगाने सदर मिळकतीबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून बांधकाम परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, गहाण, दान, दावा, वारसा, वहीवाट, विश्वस्त बोजा, विक्री, कुळारग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या २०३, अली प्लाझा, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नसल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

वकील
(अॅड. कल्पना एस. म्हात्रे)

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पालघर विभाग पालघर**

२०७, २रा मजला, प्रशासकीय कार्यालय 'बी', शासकीय कार्यालय कॉम्प्लेक्स, बोईसर रोड, कोळगाव पालघर.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**एस.आर.एन क्रमांक : PLG/12225/18/24**
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ACC/558/2024**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : TEJASVI SANGATI TRUST**
**न्यासाचा पत्ता :- C/O. CHANCHLESH YADAV, FLAT NO D/703, KAILASH TOWER, NEAR D MART, YASHWANT VIVA TOWNSHIP, NALLASOPARA (E), Palghar**
**अर्जदार : CHANCHLESH YADAV**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | रोख | १०००/- |

**(अ) जंगम मिळकत:- रोख रु. १०००/- फक्त (अक्षरी रुपये एक हजार फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

**(ब) स्थावर मिळकत:- रोख रु. ०/- मात्र (अक्षरी रुपये फक्त )**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशारितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पालघर

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की गाव मौजे बोळींज, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील (१) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. १, एकुण क्षेत्र १७-२०-०० आर.चौ. मीटर, (२) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. २/२. एकुण क्षेत्र ११-१०-०० आर.चौ. मीटर, (३) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ५/२, एकुण क्षेत्र १०.१०.०० आर.चौ. मीटर, (४) सर्वे नं. २२८, हिस्सा नं ५/३, एकुण क्षेत्र १९-६०-०० आर.चौ. मीटर, (५) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ९/२, एकुण क्षेत्र ०३-५०-०० आर. चौ. मीटर, ह्या जमिन मिळकत सातबारा सदरी श्री विकास मोरेश्वर नाईक व श्री अनंत रामचंद नाईक आणि इतर ह्यांचे मालकीची आणि कब्जेवहीवाटीची आहे आणि (१) सर्वे नं. २२८, हिरसा नं. २/१, एकुण क्षेत्र १३.१०.०० आर चौ मीटर, (२) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ३/१, एकुण क्षेत्र ०८-१०-०० आर. चौ. मीटर, (३) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ५/१, एकुण क्षेत्र २३-१०-०० आर. चौ. मीटर, (४) सर्वे नं २२८, हिस्सा नं ९/१, एकुण क्षेत्र ०६-६०.०० आर. चौ. मीटर, ह्या जमिन मिळकत सातबारा सदरी श्री विकास मोरेश्वर नाईक आणि इतर ह्यांचे मालकीची आणि कब्जेवहीवाटीची आहे आणि (१) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ४. एकुण क्षेत्र ०२-५०.०० आर. चौ. मीटर, (२) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ६. एकुण क्षेत्र ०४-00-00 आर. चौ.मीटर, (३) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ७, एकुण क्षेत्र २०.३०-०० आर.चौ. मीटर, (४) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ८, एकुण क्षेत्र ०३-५०.०० आर. चौ. मीटर, (५) सर्वे नं २२८, हिस्सा नं. १०, एकुण क्षेत्र ०४.३०-०० (६) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. ११, एकुण क्षेत्र ०५.६०-०० आर.चौ. मीटर, (७) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. १२, एकुण क्षेत्र १४.७०.०० आर.चौ. मीटर. (८) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. १३. एकुण क्षेत्र ३-५०.०० आर. चौ. मीटर, (९) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. १४, एकुण क्षेत्र ०४.00.00 आर.चौ. मीटर, (१०) सर्वे नं. २२८, हिस्सा नं. १५, एकुण क्षेत्र ०३.५०.०० (११) सर्वे नं. २२८, हिस्सा नं १६, एकुण क्षेत्र ०३.३०-०० ह्या जमिन मिळकत सातबारा सदरी श्री अनंत रामचंद नाईक ह्यांचे मालकीची आणि कब्जेवहीवाटीची आहे.

सदर मिळकती संदर्भात बांधकाम परवानगी मिळणेबाबत माझे अशिलांनी मे उपसंचालक नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपलिका यांचेकडे अर्ज सादर करणार आहे तरी सदर मिळकती संबधी कोणाचाही कोणताही मालकी हक्क, विकी, कुळरग, कब्जा, वारसा, गहाण, दान, बक्षीस, करार, वहीवाट, मार्ग, मृत्यपत्र, कोट, दरबार वा अन्य कोणत्याही प्रकारच्चा हक्क, हितसंबध हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी त्याबाबत मला लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत मला लेखी पुराव्यासह ए/१०३, पॅराडाइज अपार्टमेंट, एसटी डेपो रोड, पंचमुखी हनुमान मंदीरासमोर, नालासोपारा पश्चिम, तालुका वसई, जिल्हा पालघर ह्या पत्त्यावर कळवावे अन्यथा तसा कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध हिस्सा अधिकार नाही व असल्यास तो सोडून दिला आहे असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी .

**दिनांक - २६.०९.२०२४**

जमिन मालकाचे वकील
अॅड. मधुर मोहन गिरी

**IN THE PUBLIC TRUST REGISTRATION OFFICE**
**GREATER MUMBAI REGION, MUMBAI**
Dharmadaya Ayukta Bhavan, 1st. Floor, Sasmira College, Sasmira Road, Worli, Mumbai-400 030

**PUBLIC NOTICE OF INQUIRY**
**Change Report No. ACC/V/6534/2024**
Filed By: Mr. Gaurang M. Mehta
In the matter of: **Shri Surti Dasha Porwad Bania Community of Bombay Trust P.T.R. No. A-1989 (Mumbai)**

Mr. Gaurang M. Mehta ..... **Reporting Trustee**

To,
All concerned having interest: -

WHEREAS the trustees of the above trust have filed Change Report, under section 22 of the said Maharashtra Public Trust Act, 1950 for bringing the below describe property on the record of the named trust and an inquiry is to be made by the Assistant Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai viz.

2) Whether the property is the property of the trust? and could be registered in the name of the above trust?

**DESCRIPTION OF THE PROPERTY:-**

**IMMOVABLE PROPERTY**

i Flats being, Flat Nos. 306,307 and 308 admeasuring about 2637.5 sq. ft. Built up area on 3rd floor of the building known as 'Gokul Plaza' being lying and situate on plot situated at New Road, (Nai Sadak) Nathdwara, Dist. Rajsamand and corresponding old Flat Nos. 6,7 and 8 admeasuring about 3005 Sq. ft. Built up area, as shown in the floor plan in the 'Gokul Plaza' alongwith open terrace above the said flat Nos. 6, 7 & 8 purchased by an Agreement Dated 06.02.2006 and Sale Deed Dated 10.03.2006.

ii Flat No. 305 admeasuring about 579.6 sq.ft Carpet area on 3rd floor of the building known as 'Gokul Plaza' being lying and situate on plot situated at New Road, (Nai Sadak) nathwara, Dist. Rajsamand and corresponding old Flat No. 5 purchased by a Sale Deed dated 19.02.2007.

This is to call upon you to submit our objections or any evidence if any, at above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed and necessary order will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given my hand and seal of the Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

**This date 13.09.2024**

Seal

**Sd/-**
**Superintendent - J**
**Public Trust Reg. Office,**
**Greater Mumbai Region, Mumbai.**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 96
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊळकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ९६
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## निमंत्रितांचे हास्य कविसंमेलन उत्साहात संपन्न

**मुंबई :** 'मुंबई मराठी साहित्य संघ' आणि 'सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१सप्टेंबर रोजी गिरगाव येथे हास्य कविसंमेलन संपन्न झाले. यावेळी कवी नितीन वरणकार यांच्या 'माया कोरा रायला कागद अन् सरून गेली शाई, बुड्यानं माया लग्नाची बेज्या केल्या घाई' या कवितेने अक्षरशः हशा पिकला, तर प्रवीण बोपुलकर यांच्या 'व्हॅलेंटाईन आता साजरा मला करावा वाटत नाही, कारण एकच, जुना एकही नंबर आता लागत नाही', या गझलेचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी केले, तर कार्यक्रमाचा आढावा कार्यवाह अशोक बेंडखळे यांनी घेतला. प्रमुख अतिथी म्हणून प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव, उपाध्यक्ष डॉ. उज्वला मेहेंदळे, शब्दवेल सचिव अश्विनी अतकरे, खजिनदार देवेंद्र इंगळकर उपस्थित होते.




### गारगाई पाणी पुरवठा प्रकल्पाला पालिकेकडून पुन्हा चालना

# मुंबईकरांना मिळणार आणखी 450 दशलक्ष लिटर पाणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्यासाठी आणखी रोज ४५० एमएलडी पाणी मिळावे यासाठी मुंबई महानगरपालिकेने गारगाई पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेतला आहे. पण तेथील बाधित होणाऱ्या वनजमिनीच्या परिपूर्ततेसाठी मुंबईला महापालिकेला चंद्रपूर जिल्ह्यात ४८८ हेक्टर सरकारी जमीन मिळाली आहे. आता या हेतूसाठी उर्वरित १७१ हेक्टर जमीन मिळविणे बाकी आहे.

शिवाय प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या दोन गावांसह अन्य चार, अशा सहा गावांच्या पुनर्वसनासाठी वाडा तालुक्यातील देवळी येथे ४०० हेक्टर जमीनही उपलब्ध होत असल्याने गारगाईचे पाणी लवकरच मुंबईला मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे.

मुंबईला रोज सुमारे ३८५० एमएलडी पाण्याचा पुरवठा केला जातो. मुंबईची वाढती लोकसंख्या पाहता पालिका हद्दीत रोज ४४०० एमएलडी पाणीपुरवठा होण्याची गरज आहे. हे लक्षात घेता गारगाई, पिंजाळ या योजनांचा विचार केला जात आहे. गारगाई धरण प्रकल्पासाठी ११०० हेक्टर वनजमीन बाधित होणार आहे. त्यामुळे २०१५ मध्ये हाती घेतलेला हा प्रकल्प २०१९ मध्ये थांबविण्यात आला होता. बाधित होणाऱ्या वनक्षेत्रातील सुमारे पाच लाख झाडांचे अस्तित्व हा प्रमुख मुद्दा होता.

बाधित वनक्षेत्राच्या प्रतिपूर्तीसाठी एकूण ६५९ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. त्यासाठी आता मुंबई महापालिकेला चंद्रपूर जिल्ह्यात ४८८ हेक्टर जमीन मिळाली आहे. ही जमीन सरकारी मालकीची आहे. आता आणखी १७१ हेक्टर जमिनीचा शोध सुरू आहे. त्यासाठी खासगी जमिनीचे संपादन करण्याचा पर्यायही पालिकेने खुला ठेवला आहे. कारण मुंबई परिसरात जमीन संपादनाच्या खर्चापेक्षा चंद्रपूरसारख्या भागात तुलनेत कमी खर्चात खासगी जमीनही मिळू शकते, असे अतिरिक्त महापालिका आयुक्त ( प्रकल्प ) अभिजित बांगर यांनी सांगितले.

गारगाई पाणीपुरवठा योजनेत बाधित होणाऱ्या वनक्षेत्राच्या भरपाईसाठी चंद्रपूर जिल्ह्यात अभयारण्य क्षेत्रानजीकच्या चार गावांतील जमीन पालिकेला सरकारकडून मिळणार आहे.

गारगाई प्रकल्पामुळे बाधित होणारी दोन गावे आणि त्या परिसरातील आणखी चार गावे, अशा सहा गावांतील एकूण ६१९ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे.

**_वर्षभराचा पाणीसाठा होण्यासाठी आणखीन २५ हजार दशलक्ष पाण्याची गरज_**

*मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावात पुढील वर्षभरासाठी पाणी कपातीशिवाय सुरळीत पाणीपुरवठा होण्याकरिता १४,४७,३६३ दशलक्ष लिटर पाणीसाठा असणे आवश्यक असते. मात्र सध्या सात तलावात मिळून १४,२२,६३४ दशलक्ष लिटर (९८.२९ टक्के) इतका पाणीसाठा जमा झाला आहे. अद्यापही पावसाळ्यातील शेवटचा आठवडा बाकी असून या कालावधीत चांगला पाऊस पडून २५ हजार दशलक्ष लिटर पाणीसाठ्याची वाढ होणे गरजेचे आहे.*

# वायू प्रदूषण नियंत्रण योजना प्रभावीपणे राबवा!

### पालिका आयुक्त भूषण गगराणी यांचे निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

वातावरणीय बदलांमुळे हवेच्या दर्जात होणारे बदल, त्यातून जनजीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रमाणित कार्यपद्धतीसह उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. त्याहीपुढे जावून व सखोल अभ्यास करून वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना वेळीच कराव्यात. वातावरणीय जोखमींचे अधिक प्रभावीपणे व्यवस्थापन करून हरित दृष्टिकोन विकसित करावा, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रशासकीय विभाग कार्यालयाने (वॉर्ड) आपल्या कार्यक्षेत्रात वायू प्रदूषण कमी करण्यासाठी स्थानिक गरजानुरुप उपाययोजना आखाव्यात, उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी व देखरेखीसाठी समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, असे निर्देश देखील गगराणी यांनी दिले आहेत.

'वातावरणीय बदल: हरित दृष्टिकोन विकसित करण्याची गरज' या विषयावर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी बैठक पार पडली. त्यावेळी गगराणी यांनी विविध निर्देश दिले.

अतिरिक्त पालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी, वातावरणातील बदलांमुळे मुंबई महानगरासह संपूर्ण मुंबई प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होत असल्याचे यापूर्वी आढळून आले आहे. प्रामुख्याने हिवाळ्यात हवेची गुणवत्ता खालावते, असा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर यंदाचा हिवाळा सुरु होण्यापूर्वी वेळीच सजग राहून उपाययोजनांना वेग देणे आवश्यक आहे. वायू प्रदूषणात वाढ होत असल्याचे आढळून आल्यास त्यास प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने प्रभावीपणे उपाययोजना अंमलबजावणी करण्याची गरज आहे. असे सांगितले. तर उप आयुक्त मिनार पिंपळे यांनी, वायूप्रदूषण नियंत्रित करण्यासाठी बांधकामाच्या ठिकाणांवर सक्त निरीक्षण, उघड्यावर कचरा जाळण्याचे प्रकार रोखणे आणि इंधन म्हणून लाकडाचा वापर यासारख्या स्रोतांवर तातडीने कारवाई करण्याचे महत्त्व पटवून दिले.

# विधानसभेच्या 20 जागा देण्याची रिपब्लिकन पक्षाची भाजपकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने महायुतीतील सर्वच घटक पक्ष कामाला लागले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चांगले काम केले आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येईल. गेल्यावेळी रिपब्लिकन पक्षाला

राज्य मंत्रिमंडळात स्थान, दोन महामंडळांचं अध्यक्षपद, जिल्हास्तरीय समित्यांमध्ये स्थान देण्याचं आश्वासन आम्हाला देण्यात आलेलं होतं. मात्र अद्याप रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विचार केला गेला नाही. राज्यात किमान १० ते १२ जागा आणि विदर्भात तीन जागा रिपाइंसाठी सोडाव्यात अशी आग्रही मागणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली असल्याची माहिती रिपाइंचे महाराष्ट्राचे सरचिटणीस



गौतमभाऊ सोनवणे यांनी सांगितले.

भाजप महाराष्ट्र कार्यालय, नरिमन पॉइंट याठिकाणी दोन दिवसापूर्वी रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने गौतमभाऊ सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने 20 जागेचा प्रस्ताव भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्याकडे सादर केला आहे.त्यापैकी किमान 10 ते 12 जागा देण्यात यावे अशी मागणी भाजप नेतृत्वाकडे केली असल्याची माहिती गौतमभाऊ सोनवणे यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे महाराष्ट्रात संघटनात्मक बांधणी आहे.राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यात रिपब्लिकन पक्षाची ताकद आहे.आमच्या सोबत प्रामाणिक कार्यकर्त्यांची फौज आहे.राज्यात महायुती सरकार शासन आपल्या दारी आणि लाडकी बहिण योजनेचे कार्यक्रम घेते तेंव्हा रिपब्लिकन कार्यकर्त्यांना डावलले जाते.त्यांना सन्मानाने या शासकीय कार्यक्रमांना निमंत्रित केले जात नाही. रिपब्लिकन पक्ष हा महायुती चा प्रमुख घटक पक्ष आहे. त्यामुळे महायुती सरकारने रिपब्लिकन कार्यकर्त्यांना जिल्हा नियोजन समिती जिल्हा तालुका कमिटी राज्यस्तरीय महांमंडळांवर सत्तेत सहभाग द्यावा अशी मागणीही गौतमभाऊ सोनवणे यांनी केली.

# आणिक आगारात भाडेतत्त्वावरील बसेस पडल्यात धूळ खात

### आज ठाकरे शिवसेना करणार पाहणी

प्रतिनिधी
■ मुंबई

गल्ली बोळात बेस्ट पोचावी आणि अधिक अधिक मुंबईच्या प्रवासी वर्गास सुखकर सेवा मिळावी म्हणून बेस्ट उपक्रमाने साधारण चार वर्षापूर्वी मिनी बसगाड्या प्रवासी वर्गाच्या सेवेत आणल्या होत्या मात्र सदर बस वारंवार बंद पडणे तसेच कंत्राटदारांनी बेस्टची थकित बिल न दिल्याने बेस्ट सदर गाड्या बेस्ट उपक्रमाच्या आणिक आगारात तश्याच ठेवून दिल्या आहेत.सदर



बस गाड्या चार वर्षांपासून अश्याच उभ्या असल्याने त्याकडे कुणाचेच लक्ष नाही.मुंबई कर जनतेस बस कमी असल्याने वेळेवर सेवा मिळत नाही दुसरी कडे बेस्टच्या सायन येथील आणिक आगारात ह्या बस धूळ खात पडून आहेत.

सदर बेस्टच्या आणिक आगारात बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत,सायन विधासभा प्रमुख गोपाळ शेलार, महिला विभाग संघटक श्रीमती पद्मावती ताई शिंदे,विधानसभा संघटक गजानन पाटील,उप विभागप्रमुख .प्रभाकर भोगले, माजी नगरसेवक रामदास कांबळे,शाखाप्रमुख संजय म्हात्रे, नंदा शाहू,आज सकाळी 10 वाजता आणिक आगार पाहणी करणार आहेत.

## पालिका अभियंत्याकडे 55 लाखांच्या खंडणीची मागणी; 6 अटकेत

**मुंबई:** पालिकेच्या दुय्यम अभियंत्याला पदवी बनावट असल्याचे सर्वांना सांगून बदनामी करण्याची भीती घालून एका टोळीने ५५ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. तसेच त्याने दुखावलेले दोघे जण त्याला ठार मारणार असल्याचे सांगून ते प्रकरण मिटविण्याचा नावाखाली दोन लाख उकळले. अखेर, अभियंत्याने पोलिसांत धाव घेतल्यानंतर गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने सापळा रचून तीन लाखांची खंडणी स्वीकारताना सहा जणांना अटक केली.

# उपायुक्त दिघावकर, चंदा जाधव यांची बदली

### प्राची जांभेकर शिक्षण उपायुक्त पदी

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना मुंबई महापालिकेत अधिकाऱ्यांच्या बदलीचे सत्र सुरू झाले आहे. उपायुक्त (विशेष) किरण दिघावकर आणि उपायुक्त (शिक्षण) चंदा जाधव यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. तसेच, शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या व संचालक (नियोजन) पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या प्राची जांभेकर यांची उपायुक्त (शिक्षण) या पदावर वर्णी लावण्यात आली आहे.

यामध्ये, किरण दिघावकर यांच्या बदलीमागे होर्डिंग मालक संघटनांनी मंत्रालयातून आणलेला राजकीय दबाव कारणीभूत असल्याचे जोरदार चर्चा पालिका वर्तुळात सुरू आहे. घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून मोठी दुर्घटना घडली आणि त्यामध्ये काही लोकांचा बळी गेला तर अनेकजण जखमी झाले होते. या घटनेचे तीव्र पडसाद त्यावेळी उमटले होते. या घटनेनंतर मुंबई महापालिका



प्रशासन आक्रमक झाले होते. होर्डिंग, जाहिराती यांची जबाबदारी पार पाडणारे उपायुक्त दिघावकर यांनी बनविलेले होर्डिंगबाबतचे विशेषतः डिजिटल होर्डिंगबाबतचे जाचक धोरण हेच त्यांच्या बदलीचे मूळ कारण ठरले असल्याचे बोलले जाते. होर्डिंग मालक संघटनांनी त्यावर आक्षेप घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरबारात गाऱ्हाणे घातल्याची चर्चा होती.

होर्डिंग मालक संघटनांनी पालिकेच्या जाचक होर्डिंग धोरणाबाबत अगोदर किरण दिघावकर यांच्याकडे गाऱ्हाणे घातले होते. मात्र त्यांनी त्यास अपेक्षित दाद दिली नाही. उपायुक्त दिघावकर यांनी, नव्याने बनविलेल्या जाचक व कडक होर्डिंग धोरणाबाबत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. अनेकांनी डिजिटल होर्डिंगमुळे वाहन चालकांना वाहन चालवताना जास्त त्रास होतो. लक्ष विचलित होऊन वाहनाला अपघात होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. तसेच, पादचाऱ्यांना रस्त्याने चालताना डिजिटल होर्डिंगच्या प्रखर प्रकाशामुळे डोळे दिपतात, डोळ्यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे उपायुक्त दिघावकर यांनी, डिजिटल होर्डिंगबाबत कडक धोरण अवलंबले. त्यास होर्डिंग मालक संघटनांनी आक्षेप घेत विरोध दर्शवला होता. मात्र त्यास दिघावकर यांनी अपेक्षित दाद न दिल्याने प्रकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दरबारात गेले होते. त्यानंतर काही दिवसातच उपायुक्त दिघावकर यांच्या बदलीचे आदेश निघाले.

# महाराष्ट्रातील बोलींना प्राधान्य देणारी 8व्या वर्षीची 'बोलीभाषा एकांकिका स्पर्धा'

### ३ ते ५ जानेवारीला प्राथमिक फेरी होणार !

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठी नाट्यवर्तुळातल्या महत्वाच्या आणि विशेष एकांकिका स्पर्धांपैकी एक असलेल्या सुप्रिया प्रॉडक्शन्स आयोजित 'बोलीभाषा एकांकिका स्पर्धा' जानेवारी २०२५ मध्ये होत असून ३ ते ५ जानेवारी २०२५ रोजी प्राथमिक फेरी तर १४ जानेवारीला नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार यांच्या स्मरणदिनी अंतिम फेरी होणार आहे. स्पर्धेचे हे आठवे वर्ष आहे.

प्रसिध्द नाटककार गंगाराम गवाणकर यांची संकल्पना आणि प्रसिध्द नाट्यनिर्माते गोविंद चव्हाण यांनी घेतलेला पुढाकार यामुळे २०१६ पासून महाराष्ट्रातील ही आगळीवेगळी स्पर्धा सुरु झाली. गेल्या सात वर्षांमध्ये महाराष्ट्रभरातील वेगवेगळया बोलींमधून २८५ संघ या स्पर्धेमध्ये सहभागी झाले आहेत. मराठी रंगभूमीवरील अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून राहीलेले आहेत. या स्पर्धेची पारितोषिके मराठी रंगभूमीवर आपल्या अजरामर प्रतिभेने स्वत:चा ठसा उमटवलेल्या ज्येष्ठ-श्रेष्ठ कलावंत, लेखक, तंत्रज्ञांच्या नावाने देण्यात येतात, हे या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिकांचे स्वरुप असून प्रथम चार सांघिक विजेत्यांसाठी अनुक्रमे २५०००, २००००, १५००० व ५०००अशी पारितोषिके आहेत. प्रथम पारितोषिक विजेत्या संघाला नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार पुरस्काराने गौरवण्यात येणार असून हे पारितोषिक प्रख्यात अभिनेते अशोक सराफ व त्यांचे बंधू सुभाष सराफ यांनी पुरस्कृत केले आहे. अन्य पारितोषिकांमध्ये लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश, पार्श्वसंगीत, रंगभूषा, वेशभूषा, विनोदी लेखन, विनोदी अभिनय, वाचिक अभिनय, व्यवस्थापन या सर्वच घटकांसाठी पारितोषिके आहेत. तसेच प्राथमिक फेरीमध्ये १० जणांना अभिनय सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येते.

स्पर्धेचे नियम व प्रवेश अर्ज २५ सप्टेंबरपासून www.supriyaproduction.com या वेबसाईटवर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी ९९३०४६६९२४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संघांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जोगेश्वरीच्या जागेवरून आता भाजपात रस्सीखेच

■ मुंबई

जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघावरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपात रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात माजी नगरसेविका उज्वला मोडक यांच्यानंतर आता जिल्हाध्यक्ष संतोष मेढेकर यांच्या कार्यकर्त्यांनी सर्वोदय नगर



याठिकाणी एकत्र येऊन उमेदवारीसाठी मंगळवारी मागणी केली आहे. जोगेश्वरी विधानसभा अध्यक्ष मंदा माने यांनी जिल्हाध्यक्ष अध्यक्ष संतोष मेढेकर यांना उमेदवारी द्यावी, अशी इच्छा व्यक्त केली. जिल्हाध्यक्ष संतोष मेढेकर हे मागील अनेक वर्ष जुन्या आणि नवीन सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करत असल्यामुळे त्यांच्या कामामुळे आम्ही प्रभावित झालो आहोत. जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात भाजपचे तीन नगरसेवक असून शिंदे गटाचे २ नगरसेवक आणि भाजपाचे २ नगरसेवक कमी मताधिक्याने पडले आहे. मात्र भाजपने मागील काही वर्षात प्रत्येक प्रभागात पक्ष संघटना मजबूत केल्याचा दावा केल्यामुळे कार्यकर्त्यांने इच्छा बोलून दाखवली.

## महावाचन उत्सव अंतर्गत एक लाख शाळांची नोंदणी

**मुंबई:** विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने राज्यात शालेय शिक्षण विभागामार्फत महावाचन उत्सव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत 25 सप्टेंबर 2024 पर्यंत एक लाखांहून अधिक शाळांनी नोंदणी केली असून 42 लाख 84 हजारांहून अधिक विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले असल्याची माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिली आहे. बीड जिल्ह्यात सर्वाधिक 96.22 टक्के विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला आहे. राज्यात 2023 मध्ये राबविण्यात आलेल्या महावाचन उत्सव उपक्रमामध्ये 66 हजार शाळांनी नोंदणी केली होती. त्या तुलनेत या वर्षी राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधील इयत्ता तिसरी ते बारावी मधील सर्व विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला असून 16 ऑगस्ट 2024 पासून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत 25 सप्टेंबर पर्यंत एक लाखांहून अधिक शाळांनी नोंदणी केली आहे.

**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक**

म्हाडा MHADA

**निवीदा सुचना**

कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, गृहनिर्माण भवन, २ रा मजला, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई-४०००५१, नोंदणीकृत पात्र कंत्राटदाराकडून बी १ फॉम [टक्केवारी द] अधिकृत विद्युत कंत्राटदार म्हाडा/ पीडब्ल्यूडी / एमसीजीएम किंवा कोणत्याही शासनामध्ये नोंदणीकृत असावा. तसेच समान प्रकारच्या कामाचे मनुष्य पुरविण्याचा पुरेसा अनुभव असणे.

| निविदा क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकाची रक्कम रु. | इसारा रक्कम १% अंदाजपत्रकीय किंमतीपुरवठा | सुरक्षा अनामत रक्कम २% अंदाजपत्रकीय दराच्या | कंत्राटदाराचा वर्ग | निविदेची रक्कम १८% जीएसटी सह | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत क्र. ५अ, ५बी, ५सी, डी, ई बॉम्बे डाईंग आणि इमारत क्र. १अ १ब, १सी सेंच्युरी मिल येथे येथे पाणी पुरवठा करण्यासाठी बसविलेल्या पंप चालविणे [कालावधी ७३१ दिवस ] | ४२,०४, १२७/- | ४२,०४१/- | ८६०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | वर्ग अ | ५९०/- | २४ महिने [मान्सून सह] |
| २. | इमारत क्र. १ २अबक, ३ अबक, ४ अबकड बॉम्बे सुरवातीला डाईंग आणि इमारत क्र. १ब श्रीनिवास मिल येथे येथे पाणी पुरवठा करण्यासाठी बसविलेल्या पंप चालविणे [कालावधी ७३१ दिवस] | ७३,५७,२२३/- | ७३,५७२/- | १४८०००/- सुरवातीला ५०% आणि ५०% देयक मार्फत | वर्ग अ | ११८०/- | २४ महिने [मान्सून सह] |

निविदेचे वेळापत्रक -

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १. | निविदा प्रसिद्धीचा दिनांक | २६/०९/२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| २. | निविदा विक्रीचा दिनांक | २६/०९/२०२४ सकाळी १०.३० वाजता |
| ३. | निविदा विक्रीचा अंतिम दिनांक | ०२/१०/२०२४ सायंकाळी ०५.०० वाजता |
| ४. | निविदा दाखल दिनांक | २६/०९/२०२४ सकाळी १०.३५ वाजता |
| ५. | निविदा दाखल अंतिम दिनांक | ०२/१०/२०२४ सायंकाळी ०५.०० वाजता |
| ६. | निविदा उघडण्याचा दिनांक | ०४/१०/२०२४ सकाळी १०.३० वाजता |

निविदा प्रक्रीये संबंधातील संपूर्ण माहिती ऑनलाईन [e-tendering] मार्फत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त होतील. शुध्दीकरण / ॲडिशन जर असेल तर फक्त वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

CPRO/A/755

सही/-
कार्यकारी अभियंता
विदयुत विभाग / मुंबई मंडळ, म्हाडा

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us: @mhadaofficial

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com
फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
वेबसाईट : www.panvelcorporation.com

**| ई-निविदा सूचना क्र : पमपा/ उद्यान / ५५२५/प्र.क्र.०१/३८७/२०२४** **दिनांक : २५/०९ / २०२४**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) २०२४-२५ योजने अंतर्गत पनवेल महानगरपालिका हद्दीत नागरी दळणवळण साधनांचा विकास अंतर्गत प्रवाशांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी पर्यावरण पुरक बस थांबे विकसित करणे. | PMC / Garden /10/2024-25 | रु.८,७०,५६,९७४/- (GST विरहित) | ८,७०,६००/- | |

या कामाच्या ई - निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.४८०/४८२/२०२४
दिनांक: २५/०९/२०२४
संदर्भ :- जा.क्र. पमपा/ उद्यान/५५२४/प्र.क्र.०१/३८९/२०२४
दिनांक : २५/०९/२०२४

सही /-
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त - I,
पनवेल महानगरपालिका, पनवेल

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित


**इ–निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२४–२५/३१**

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३०००५१९३४ / ईएम | संच क्र ५ सीओएच दरम्यान संच क्र. ५ च्या सी.टी. फॅन एमसीसी पॅनलच्या जुन्या एअर सर्किट ब्रेकरचे नुतनीकरण/ पुर्वनिर्मिती/ दुरूस्ती आणि सुधारणा करून नविन एअर सर्किट ब्रेकरचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करण्याचे काम. (रिफ्लोटेड) | २२,७७,०७२/– / २६,२७०/– |
| २. | ३०००५२०२१ / सीएचपी | एफसीयु प्रकारच्या संपुर्ण फ्लुएड कपलिंग आणि स्पेअर्सचा पुरवठा. | १९,०८,१५३/– / २२,६००/– |
| ३. | ३०००५२०२५ / सीएचपी | सीएचपी २ आणि ३ मधील वॅगन टिपलर आणि संबंधित सहाय्यकांच्या सर्व्हिसिंगसाठी कामाचा वार्षिक करार. | १०६,२६,५१०/– / १,०९,८००/– |
| ४. | ३०००५२०१० / बीएम | कोणत्याही युनिट साठी एपीएच परफॉर्मन्स आणि डिडस्टींग प्रणाली पुरवणे आणि सुधारित करून निश्चित करणे. | ४८,८४,१००/– / ५२,४००/– |
| ५. | ३०००५२०३६ / ओडीपी | डब्ल्युटीपीमध्ये फॅब्रिकेशन च्या कामाव्दारे सॉफ्टनर्सच्या नोझल बेस प्लेटचे व त्याच्या सपोर्ट्सचे खराब झालेले भाग दुरूस्त करणे / बदलण्याचे कंत्राट. | ५०,२०,४५४/– / ५३,७१०/– |
| ६. | ३०००५२०३७ / सिव्हिल | युनिट क्र ५ सीओएच दरम्यान पीसीआर मध्ये व्हिट्रिफाइड फ्लोरिंग टाइल्स प्रदान करणे आणि दुरूस्त करणे. (रिफ्लोटेड) | ८,०८,३२५ /– / ११,५९०/– |

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/–, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

मी जगातील कोणत्याही विद्यापीठात पहिला आलो नाही. मात्र जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठात आलेले विद्यार्थी आज माझ्या हाताखाली काम करतात.



- बिल गेटस
प्रसिद्ध उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४

# जिवाणूही प्रगत होतोय...

माणूस अधिक प्रगत होत चालला आहे. प्रगत होत चालला असला तरी प्रगल्भवताना मात्र दिसत नाही. प्रगतीच्या नावे तो अनेक घातक संकटे निर्माण करू लागला आहे. आरोग्याला धोका पोहोचवणाऱ्या या संकटांना जन्म देऊ लागला. पटकी अथवा प्लेगच्या साथीने घातलेला धुमाकूळ आणि त्यानंतर पटापट मोठी मोठी पडणाऱ्या माणसांच्या संख्येमुळे तो घाबरून गेला होता. त्यासाठीच्यावेळी त्याचे डोळे उघडले होते. त्यातून तो काहीतरी बोध घेईल असे वाटले होते. पण बघत होत चाललेला या माणसाने काही बोध घेतलेला दिसत नाही. कोरोना नावाचा संकटाच्या वेळी ही बाब दिसून आली. कोरोनाच्या विषाणूने माणसाने कशामध्ये प्रगती केली हे दाखवून दिले आहे. त्याने अनेक बाबतीत प्रगती केलेली असली तरी आरोग्याच्या बाबतीत मात्र त्याला पराभूत व्हावे लागत आहे. नवनवे विषाणू जीव जंतु त्याच्यावर आघात करत आहेत. प्रगतीच्या वाटा आणि दालने जशी सर्वांसाठी खुली झाली तशी समस्त मानवजातीने विज्ञानाच्या मदतीने अनेक नवनवीन शोध लावले. आकाशाला गवसणी घालत असताना परग्रहांवरसुद्धा पाऊल टाकत आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी याच प्रगतीच्या वाटेवर त्याला अनेक समस्यांचा सामना करावा लागत असून, त्यात सध्या जीवघेण्या जीवाणू व काही बुरशीजन्य जंतूंचा समावेश आहे. हे जीवाणू इतके शक्तिशाली आहेत की मानवाला त्यांचे आव्हान भविष्यात पैलवणार का, अशी चिंता जगभरातील शास्त्रज्ञांना लागली आहे. एका अभ्यासानुसार तब्बल १० हजार फूट उंचीवर शेकडो विविध प्रकारचे जीवाणू आणि बुरशीचे नमुने आढळले आहेत. मुख्य म्हणजे यातील बहुतेक प्रजातींचे जीवाणू लोकांमध्ये रोग निर्माण करण्यास सक्षम असू शकतात, असे सिद्ध झाल्याने त्यावर कशी मात करायची या विवंचनेत सर्वजण आहेत. १९२०च्या दशकात शास्त्रज्ञांनी संपूर्ण अमेरिकेमध्ये विमाने उडवून हवेत तरंगणारे बीजाणू पकडले होते. त्याला आज अनेक वर्षे झाली. अलीकडेच केलेल्या संशोधनात आकाशात अनेक अशा गोष्टी आढळून आल्या आहेत. यामुळे संशोधकही चिंतेत आहेत. तब्बल १० हजार फूट उंचीवर शेकडो विविध प्रकारचे जीवाणू आणि बुरशीचे नमुने या संशोधनात आढळले असून यात आणखी वाढ होऊ शकते. अनेक संसर्गजन्य आणि जीवनशैली रोगांशी लढा देणे हे जगातील एक मोठे आव्हान बनले आहे. अनेक जीवाणू औषधांना प्रतिरोधक बनले आहेत आणि त्यांचे जलद उत्परिवर्तन आणि उत्क्रांती हे संशोधन आणि औषध शोधात गुंतलेल्या शास्त्रज्ञांसमोर आव्हान निर्माण करीत आहे. मुख्य म्हणजे यातील बहुतेक प्रजातींचे जीवाणू लोकांमध्ये रोग निर्माण करण्यास सक्षम असू शकतात. जमिनीवर जीवजंतूंचे अस्तित्व असते याची जाणीव प्रत्येकालाच आहे. परंतु आकाशातही असेच जीवजंतू आहेत. आकाशात आढळून आलेले एकतृतीयांश जीवाणू आणि बुरशी हे माणसांसाठी रोगजनक ठरू शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सूक्ष्म जंतू जमिनीवर पडल्यास माणसांमध्ये पसरू शकतात. वाऱ्यामुळे रोग पसरू शकतात. अनेक संसर्गजन्य आणि जीवनशैली रोगांशी लढा देणे हे जगातील एक मोठे आव्हान बनले आहे. अनेक जीवाणू औषधांना प्रतिरोधक बनले आहेत आणि त्यांचे जलद उत्परिवर्तन आणि उत्क्रांती संशोधन आणि औषध शोधात गुंतलेल्या शास्त्रज्ञांसमोर आव्हान निर्माण करीत आहेत. सध्या सर्वत्र व्हायरल तापाचे प्रमाण वाढत चालले आहे. चार वर्षांपूर्वी जगभरात ज्या जीवाणूने हाहाकार माजवला होता त्या कोरोना जीवाणूचा त्रास सर्वांना सहन करावा लागला होता. त्याचे अस्तित्व अजूनही काही प्रमाणात आहे. जीवाणूंच्या अनेक प्रजाती रोगजनक आहेत आणि पटकी, गुप्तरोग, कुष्ठरोग आणि गाठचा चट्टा व या रोगांमध्ये गुरांचा सांसर्गिक रोग संसर्गजन्य रोगांमध्ये समावेश कारणीभूत आहेत. सर्वात सामान्य जीवघेणा विषाणूजन्य रोग श्वसन संक्रमण आहे. जुन्या काळात अगदी सामान्य जीवाणू संक्रमणदेखील मानवासाठी घातक ठरत असे. जीवाणू संसर्ग ज्यावर आता सहज उपचार केले जाऊ शकतात ते एकेकाळी प्राणघातक होते आणि जगभरातील लोकांना धोका होता. लस आणि प्रतिजैविकांचा विकास ही औषधांच्या क्षेत्रात मोठी प्रगती होती. जरी बॅक्टेरियाचे ताण विकसित झाले आहेत आणि प्रतिजैविक-प्रतिरोधक बनले आहेत, तरीही त्यापैकी बहुतेक प्रतिबंधित आणि बरे केले जाऊ शकतात. बॅक्टेरिया शरीरात विषारी पदार्थ स्राव करून संसर्गास कारणीभूत ठरतात. ते विषारी द्रव्येदेखील उत्सर्जित करतात, ज्यामुळे रोग होतात किंवा शरीरात आतल्या आत विष निर्माण करण्यास सक्षम असतात. असे असंख्य प्रकारचे जीवाणू आहेत जे हानिकारक असतात आणि जेव्हा मानव त्यांच्या संपर्कात येतो तेव्हा संसर्ग किंवा रोग निर्माण करतात. अलीकडेच झालेल्या एका संशोधनात कावासाकी रोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजारात ताप, पुरळ आणि कधी कधी प्राणघातक हृदयविकाराचा झटका येतो. हा आजार नक्की कशामुळे होतो, याविषयी संशोधकांमध्येच मतभेद राहिले आहेत. हा जीवाणू कोणत्या प्रकारचा आहे, याबाबत अजूनही फारशी माहिती उपलब्ध झाली नसली तरी त्याचा मोठा फटका सर्वांना बसत आहे. ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. या रोगाचे गूढ अजूनही कायम आहे. या रोगाची प्रकरणे मोठ्या प्रमाणात जगभरामध्ये आढळून येत आहेत. हा रोग कसा आला याबाबतसुद्धा अनेक पुरावे पाहिले जात आहेत. त्यानुसार जपानमध्ये ईशान्य चीनमधून वारे वाहून आले तेव्हा रुग्णांच्या संख्येत वाढ झाली. तेच वारे जेव्हा कॅलिफोर्नियापर्यंत पोहोचले तेव्हा तिथेही रुग्ण संख्या वाढली. वाहणारे वारे यासाठी कारणीभूत असू शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. वायव्य चीन हा रोगजनकांचा एक शक्तिशाली स्रोत असू शकतो असे मानले जाते. कोरोनाबाबतसुद्धा चीनकडे बोट दाखवले गेले होते. चीनच्या या भागात पिकांची आणि पशुधनाची मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. मातीतील काही सूक्ष्म जंतू किंवा अगदी खत किंवा सांडपाणी रोगास कारणीभूत ठरू शकते. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार रोग निर्माण करणाऱ्या जंतूंचा संबंध संशोधनातील जिवंत जंतूंशी असू शकतो. त्यांचे खरे स्वरूप शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मानवी पेशी किंवा प्रयोगशाळेतील प्राण्यांना संक्रमित करून संशोधन करणे हे असले तरी त्याला अनेक देशांत अजूनही गती मिळालेली नाही. यामुळे रोग वाढत चालले आहेत. वायू प्रदूषणातून जीवाणू हल्ला करीत असल्याचे मानले जाते. हे जंतू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रोग पसरवू शकतात का, याबाबत अजूनही पूर्ण संशोधन झालेले नाही. हवेत १० हजार फुटांवर असणारे रोगजनक अतिशय विरळ असतात. मात्र एकच किटाणू आरोग्य बिघडवण्यासाठी पुरेसा असतो. या रोगास एकापेक्षा जास्त रोगजनक चालना देऊ शकतात. हे जीवाणू खूप विरळ असल्याने त्यांचे मोठे आव्हान आहे. एकूणच या जीवघेण्या जीवाणूंचा सामना कसा करायचा, हा मोठा यक्ष प्रश्न जगभरात आजही कायम आहे. बदलत्या जीवनशैलीनुसार हे जीवाणूसुद्धा त्यांच्यामध्ये अंतर्गत बदल करीत असतात. यामुळे हा बदल कसा होत आहे, यावरच संशोधन झाले पाहिजे आणि आपण नेमकी प्रगती कशामध्ये करत आहोत नेमकी कशामध्ये प्रगती करण्याची गरज आहे याचे भान ठेवणे देखील गरजेचे आहे.

# नको चिंता उपचाराच्या खर्चाची.. मदत आहे शासनाची..!

राज्य शासनाने जनसामान्यांचे आरोग्य जपण्याला प्रथम प्राधान्य दिले आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहे. या निर्णयांमध्ये उपचाराचा खर्च न पेलणाऱ्या नागरिकांना केंद्रीभूत केले आहे. यामुळे जनसामान्यांना दिलासा मिळाला आहे. याशिवाय नियमित आरोग्य तपासणी करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. समाजातील प्रत्येक घटकाची आरोग्य तपासणी करण्यासाठी अभियान शासन राबवित आहे. राज्याची महत्त्वाची योजना असलेल्या 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्याचे' प्रति कुटुंब वार्षिक मर्यादा वाढविण्यात आली आहे. या निर्णयांमुळे आज कुठलाही मोठा आजार झाल्यास उपचार करण्याची चिंता नाही.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे विमा संरक्षण दीड लाखांहून 5 लाख रूपये करण्यात आले आहे. सर्वसामान्यांना खासगी दवाखान्यातील लाख रुपयांची बिले अदा करण्यापेक्षा योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंत उपचार मिळत आहे. तालुका स्तरावरील रूग्णालयेही आता या योजनेचा लाभ रूग्णांना देत आहेत. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेतंर्गत लाखो रूग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कर्नाटक सीमा भागात 865 गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. या भागातील गरजू रूग्णांना योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात येत आहे. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया याचा लाभही अडीच लाखांवरून चार लाखांपर्यंत नेण्यात आला आहे. त्यामुळे यासंदर्भात जे कोणी लाभ घेऊ इच्छित असतील किंवा जे प्रतीक्षेत आहेत, त्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक घरात 'माता सुरक्षित – तर घर सुरक्षित' ही अभिनव मोहिम राबविली. या मोहिमेदरम्यान महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता तसेच औषधांसाठी प्रति जिल्हा 2 कोटी रूपयांचा निधी देण्यात आला. या मोहिमेतून दुर्धर आजारांचे निदान झालेल्या महिलांना उपचारासाठी मदत करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात आली. विविध आजाराशी संबंधित तज्ज्ञांचेदेखील सहकार्य घेण्यात आले.

आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेवक यांच्यामार्फत घरोघरी जाऊन उपलब्ध सुविधेबाबत माहिती देण्यात येतो. महिलांमधील कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान नाक घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन करण्यात आले. राज्यात ४ कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांची आरोग्य तपासणी तसेच दुसऱ्या टप्प्यात ३ लाख १३ हजार ९६५ गर्भवती मातांवर उपचार करण्यात आले आहेत.

राज्यभरात 0 ते 18 वर्षांपर्यंतची बालके, किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे 1800 शाळांमधील 18 वर्षांखालील जवळपास २ कोटी ४९ लाख ५४ हजार २५७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. राज्यात 9 हजार तपासणी पथकांमार्फत ही अभिनव योजना राबविली आहे.

मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राज्यभर राबविण्यात आले. ही तपासणी शासकीय निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, खाजगी शाळा, आश्रमशाळा, अंध शाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाडया, खाजगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधार गृहे, अनाथ आश्रम, समाज कल्याण व आदिवासी विभाग वसतीगृहे या ठिकाणी करण्यात आली. महिला, बालकांसोबतच पुरूषांचीसुद्धा सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी 'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे' ही मोहिम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे ३ कोटीपेक्षा अधिक पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

या विभागाचा जनमानसात लोकप्रिय आणि कल्याणकारी निर्णय म्हणजे 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' होय. या निर्णयामुळे आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट झाले. सामान्य नागरिकांना अगदी सहज आरोग्य सुविधा मिळू लागल्या. गल्ली बोळात हे दवाखाने सुरू झाल्यामुळे हाकेच्या अंतरावर आरोग्य सुविधांची उपलब्धता झाली. सुरूवातीला मुंबई शहरात सुरू केलेल्या दवाखान्यांना वाढता प्रतिसाद बघता राज्यभरात दवाखाने सुरू करण्यात आले असून राज्यात 347 'आपला दवाखाना' सुरु आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी 15 ऑगस्ट 2023 पासून करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रूग्णालयांमधील बाह्य रुग्ण विभागातील रूग्णांची नोंदणी दुपटीने, तर काही ठिकाणी तिपटीने वाढली आहे.

हृदयरोग रुग्णांसाठी राज्यामध्ये सर्व सुविधांची उपलब्धता शासकीय रूग्णालयांमध्ये करण्यात येत आहे. हृदय रोगींसाठी राज्यात 12 ठिकाणी कॅथलॅबची सुविधा देण्यात आली आहे. ही सुविधा आता संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच 17 ठिकाणी एमआरआयची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे व कोल्हापूर जिल्ह्यातील उदेगांव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यात येणार आहे. हे रूग्णालय 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्युरोसायन्सेस' च्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरुग्णालय असणार आहे. यामध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे.

वृद्धांना मोतीबिंदूची समस्या मोठ्या प्रमाणावर येते. राज्य शासनाने 'मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान' राबविले. या अभियानातून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सध्या लाखांच्यावर शस्त्रक्रीया करण्यात आल्या आहेत.

सध्या विविध कर्करोगांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये स्तन, गर्भपिशवीच्या मुखाचा, मुख कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. कर्करोगावरील उपचार खूप खर्चिक आहे. शासनाने कर्करोग रूग्णांना उपचार सुलभ व्हावे, यासाठी 34 जिल्ह्यांमध्ये जिल्हा रूग्णालयात 'केमोथेरपी डे केअर' केंद्राची सुविधा दिली आहे. शासनाच्या सुविधांमुळे कर्करूग्णांवर उपचार मिळणे सोयीचे होणार आहे. तसेच कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी 8 मोबाईल कॅन्सर डायग्नोस्टिकची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. कर्करूग्णांच्या शोधासाठी आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करोगी शोधले जात आहेत. संशयित रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

मुत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त असलेल्या रूग्णांसाठी 234 तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डायलिसीस सेवा, हिमोफिलीयाग्रस्त रूग्णांसाठी प्रत्येक जिल्हा रूग्णालयात 'हिमोफिलिया डे' केअर केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी 'वात्सल्य' ही विशेष योजना राबविण्यात येत आहे. कमी वजनाच्या बालकांच्या जन्माचे प्रमाण आणि जन्मजात व्यंग असलेल्या बालकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात माहेरघर योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह 1 हजार 756 ॲम्बुलन्स खरेदीचा निर्णयही घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद गतीने उपचार मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिका उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या 36 ठिकाणी उपलब्ध शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून 352 ठिकाणी लवकरच ही सेवा देण्यात येणार आहे. अशाप्रकारे राज्य शासनाने जनसामान्यांच्या उपचाराची काळजी घेण्यासाठी विविध निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी केली आहे.

– नीलेश तायडे,
विभागीय संपर्क अधिकारी

# सदाबहार अभिनेते ; देव आनंद



हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०१ वि जयंती. १०१ वर्षांपुर्वी अजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिप, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले.

१९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत. त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात. देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले.

आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गॅंगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## पत्र मानस

### फूड पॅकेजिंगमुळे मानवी शरीरास धोका

फूड पॅकेजिंगमुळे मानवी शरीरात ३६०० केमिकल गेली असल्याचे नवे संशोधन समोर आले आहे. हे संशोधन धक्कादायक आहे. छपाईचा कागद, प्लास्टिक आणि थर्माकॉलच्या माध्यमातून हे केमिकल मानवी शरीरात जाते असे या संशोधनातून समोर आले आहे. भारतासाठी तर हे संशोधन धक्कादायक असेच आहे कारण भारतात फूड पॅकिंग करण्यासाठी वर्तमान पत्राचा कागद आणि प्लास्टिक यांचा सर्रासपणे वापर केला जातो. वर्तमान पत्रासारख्या छपाईच्या कागदाची शाई अन्न पदार्थात उतरत असल्याने वर्तमान पत्रासरख्या छपाईच्या कागदात अन्न पदार्थ विकण्यास सरकारने काही वर्षापूर्वी बंदी घातली होती मात्र ही बंदी केवळ कागदावरच आहे. अन्न पदार्थ विक्रेते आजही वर्तमान पत्राच्या कागदात अन्न पदार्थ बांधून विकतात. काही अन्न पदार्थ विक्रेते प्लास्टिकच्या पाकिटात अन्न पदार्थ विकतात. प्लास्टिकच्या पाकिटातील अन्न पदार्थ सेवणास घातक असतात. त्यातही गरम स्वरूपातील पदार्थ असेल तर ते जीवघेणं ठरू शकतात हे यापूर्वीही अनेक संशोधनातून सिद्ध झाले आहे. विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमातील प्रसाद, जेवणासाठी ही थर्माकॉलची ताटे, ग्लास, कप वापरण्यात येतात. थर्माकॉल देखील मानवी शरीरास घातक आहे तरीही त्याचा सर्रासपणे वापर होतो. सरकारनेच यावर आता कायदेशीर बंदी आणली पाहिजे. केवळ बंदी आणली म्हणजे सरकारची जबाबदारी संपली असे नाही तर सरकारने या बंदीची प्राभवी अंमलबावणी करायला हवी. जो अन्न विक्रेता वर्तमान पत्राचा कागदात किंवा प्लास्टिक मध्ये अन्न पदार्थ विकेल त्याच्यावर सरकारने कायदेशीर कारवाई करायला हवी. नागरिकांनीही प्लास्टिक किंवा वर्तमान पत्राचा कागदात अन्न पदार्थ स्वीकारू नयेत.

- श्याम ठाणेदार. पुणे

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त पालिका मुख्यालयात अभिवादन

**नवी मुंबई :** थोर समाजसुधारक व विचारवंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री. शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करुन भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्री. उत्तम खरात, श्री. विलास मलुष्टे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. समाजातील अंतिम व्यक्तीच्या विकासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून त्यादृष्टीने वाटचाल करण्याची प्रेरणा पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या चरित्रापासून मिळते त्यामुळे त्यांचा जयंती दिन अंत्योदय दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.




## महत्त्वाचे

### मीरा भाईंदरमध्ये राम कथा भव्य कार्यक्रम

**मीरा रोड :** मिरा-भाईंदर रोड येथील एसके स्टोन कॉम्प्लेक्स येथे दिव्य श्री राम कथेचा भव्य कार्यक्रम आमदार गीता जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. प्रसिद्ध कथाकार आणि मनाचा अभ्यासक आदरणीय श्री रामभद्राचार्य जी महाराज व्यासपीठातील हजारो राम भक्तांना श्री रामकथेचे अमृत प्रदान करत आहेत. या रामकथेला उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी विशेष उपस्थिती लावून रामकथा श्रवण केली. त्यांनी पूज्य श्री राम भद्राचार्यजी महाराजांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले आणि आरतीतही सहभागी झाले. यावेळी त्यांनी हजारो राम भक्तांना संबोधित केले.

### भविष्य पाहण्याच्या बहाण्याने उद्योजकाला लुटले

**कल्याण :** तुला बक्कळ पैसा, आरामदायी जीवन हवे असेल. तुझा भाग्योदय व्हावा असे वाटत असेल तर तु आमच्या सोबत चल. एक ज्योतिष पाहणारा बाबा आहे. तो तुझे ज्योतिष पाहून चांगले सल्ले देईल. आणि तुझ्या जीवनाचा कायापालट होईल, असे तीन जणांनी कल्याण पूर्वेतील एका केबल व्यावसायिकाला सांगितले. या व्यावसायिकाला मलंगगड रोड भागात एका इमारतीत नेऊन त्याला तेथे बांधून तीन जणांनी त्याच्या जवळील ८७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.२७ हजार रुपये रोख रक्कम, तीन महागडे मोबाईल या वस्तूंचा लुटीमध्ये समावेश आहे. विजय रामचंद्र गायकवाड (५६) असे केबल व्यावसायिकाचे नाव आहे. ते कल्याण पूर्वेतील गायत्री शाळा परिसरातील शिवराम पाटीलवाडी भागात राहतात. गिरीश रमेश खैरे (५०, रा. शिवराम पाटीलवाडी, कल्याण पूर्व), विनायक किसन कराडे, विनयकुमार कृष्ण यादव उर्फ राघव अशी आरोपींची नावे आहेत. मंगळवारी सकाळी साडेअकरा ते दुपारी तीन या कालावधीत कल्याण पूर्वेतील मलंग रोड भागातील काका ढाबा परिसरातील सखुबाई पाटील नगर भागातील चेतन पार्क या इमारतीमधील एका सदनिकेत हा प्रकार घडला.

### वेश्या व्यवसायातील दलालावर कारवाई; महिलांची सुटका

**नवी मुंबई :**करंजाडे परिसरात महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेत त्यावर गुजराण करणाऱ्या आरोपीवर पोलिसांनी कारवाई केली आहे. त्याच्या ताब्यातील तीन महिला आणि एक अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने केली आहे. राजू मंडल ऊर्फ वेजद अल्ली खान असे यातील आरोपीचे नाव आहे. तर शायना व अन्य एक आरोपी हे दोन्ही आरोपी महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करवून घेत त्यातील काही पैसे स्वत:कडे ठेवत होते. त्याच पैशातून गुजराण करीत होते. याबाबत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पृथ्वीराज घोरपडे यांना माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर बनावट ग्राहकांनी आरोपींशी संपर्क केला असता महिला पुरवणारा मध्यस्थ इसम राजु मंडल (वेजद अल्ली खान) हा ग्राहकांना वेश्यागमनासाठी १६ ते १७ वर्षाच्या मुली पुरवत होता.

# माथाडी कामगारांचे 'दैवत' अण्णासाहेब पाटील आमच्यासाठी प्रेरणादायीच - फडणवीस

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

एकेकाळी हमाल म्हणून गणल्या गेलेल्या माथाडी कामगारांवर कोणीही लक्ष देण्यास तयार नव्हते. या कामगारांचे भविष्य काय, त्यांच्या मुलांचे भविष्य काय, असे अनेक प्रश्न होते तर त्यांच्यासाठी कोणताही कायदा त्याकाळात नव्हता. त्यांची आर्थिक पिळवणूक व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना परिसीमा नव्हती. अशा या कामगारांसाठी स्व.अण्णासाहेबांनी अथक परिश्रमाने ऐतिहासिक माथाडी कामगार कायद्याची निर्मिती केली त्यांना आजच्या या जयंती निमित्त अभिवादन करतो, त्यांच्याकडे दैवत म्हणून आम्ही पाहतो. त्यांच्या कार्यापासून आम्हाला मोठी प्रेरणा मिळते. असे ऐतिहासिक माथाडी कामगार चळवळीचे व मराठा आरक्षण मागणीचे जनक मराठा क्रांतीसुर्य कै. आमदार अण्णासाहेब



पाटील यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त नवीमुंबईतील कांदा-बटाटा मार्केट मधील लिलावगृह येथे महाराष्ट्र राज्य माथाडी,ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्यावतीने अयोजित केलेल्य मेळाव्यात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ऐसिहासिक कामगार कायद्याच्या निर्मितीमुळे आज माथाडी कामगारांचे अस्तित्व अबाधित आहे. हा कायदा बदलण्याचे प्रयत्न अनेक सरकारांनी केले आताही तीच परिस्थिती आहे. तेव्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कारकीर्दीत या माथाडी कायद्यातील त्रुटींमध्ये सुधारणा करून या कायद्याला कायमस्वरूपी सुरक्षा कवच निर्माण करून द्यावे. असे देवेंद्रजींनी केले तर अण्णासाहेबांच्या प्रत्येक जयंतीला माथाडी कामगार त्यांचा उल्लेख अदबीने करत राहील असे वक्तव्य युनियनचे कार्याध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यानी आपल्या स्वागतपर प्रास्ताविक भाषणातून केले. ते पुढे असेही म्हणाले की माथाडी कामगार हाही तसा अल्पभूधारक असून पंतप्रधान आवास योजनेतील घरे ही माथाडी कामगारांना मिळाली पाहिजे. नाशिकच्या माथाडी कामगारांचा लेव्हीचा प्रश्न त्वरीत सोडवावा अशीही मागणी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. तर वडाळा येथील सोळा एकरावर ३५०० माथाडी कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न लवकरच सोडवावा व आमचा विश्वास सार्थ करावा असेही शशिकांत शिंदे म्हणाले. याबरोबरच त्यांनी मंचावर उपस्थित मान्यवरांचे, पदाधिकाऱ्यांचे व सर्व सुरक्षायंत्रणेचे या कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वागत केले.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळा शिक्षकांच्या आंदोलनामुळे बंद

## शिक्षकांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने




प्रतिनिधी
■ ठाणे

संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, कंत्राटी शिक्षक भरती रद्द करा, विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश द्या यासह इतर मागण्यांसाठी ठाणे जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांनी बुधवारी सामूहिक किरकोळ रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. या आंदोलनामुळे जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा बंद होत्या. आंदोलनादरम्यान, ठाणे जिल्हा शिक्षक समन्वय समितीच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संदिप माने यांना मागण्यांचे निवेदन दिले.

राज्य शासनाची प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील धोरणे चुकीची असल्याचा आरोप करत राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी शासनाविरोधात असहकाराची हाक दिली होती. यानुसार ठाणे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी २५ सप्टेंबरला सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला होता. परंतु पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारल्यामुळे शिक्षकांनी सामुहिक रजा घेऊन ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. शिक्षकांच्या या आंदोलनामुळे जिल्हा परिषद शाळा बंद होत्या. आधारवर आधारित संच मान्यता, वीस पटाला एक कायम आणि एक कंत्राटी शिक्षक हे शासनाचे धोरण विद्यार्थी विरोधी असल्याचा आरोप करत त्यास शिक्षक संघटनांसह पालकांनी विरोध केला आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने या निर्णयामध्ये अंशतः बदल करून वीस ऐवजी दहा पटाला एक कंत्राटी शिक्षक, प्रत्यक्ष वर्गातील विद्यार्थी संख्येवर शिक्षक निश्चिती यासारखे शासन निर्णय निर्गमित केले होते. परंतु शिक्षकांनी आंदोलनावर ठाम राहत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने केली. मोफत गणवेश योजना चुकीचे पद्धतीने राबविल्याने गणवेश उशिरा प्राप्त होत आहेत. गणवेश योजना जुन्याच पद्धतीने राबवावी. पाठ्यपुस्तकात कोरी पाने देण्याऐवजी स्वतंत्र वही द्यावी. पोषण आहार योजना स्वतंत्र्य योजनेकडे सोपवावी, याबाबत प्रामुख्याने घोषणाबाजी होत होती.

१५ मार्च २०२४ चा संच मान्यता निर्णय रद्द करा, कमी पटसंख्येच्या शाळेत कंत्राटीत शिक्षक भरतीचा निर्णय रद्द करा, शैक्षणिक आणि शैक्षणिक कामाचा शासन निर्णय शिक्षक संघटनांबरोबर चर्चा करून दुरुस्त करा, अशी मागणी ठाणे जिल्हा शिक्षक समन्वय समितीकडून यावेळी करण्यात आली.

# झेनीथ धबधब्याजवळ एकाच कुटुंबातील अडकले चौघेजण

## 22 वर्षीय तरुणी गेली वाहून

प्रतिनिधी
■ खोपोली

पावसाळ्यात बाहेर फिरायला जाताना सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे, पण गेल्या काही वर्षात सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी किंवा पावसाळी पिकनिकच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी तरुणाई बेधुंद होते. पुणे, रायगड, सातारा जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात पर्यटनस्थळी अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्यातच, दोन दिवसांपासून मुंबईसह राज्यात मुसळधार पाऊस (Rain) सुरू असून नदी, ओढ्यांना पाणी आलं आहे. रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे याच पाण्यातून मार्ग काढताना एका युवतीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना



घडली.


खोपोलीतील झेनिथ धबधब्याच्या प्रवाहातून वाहून गेलेली युवती मृतावस्थेत आढळून आली. खोपोलीच्या दत्त मंदिर मठाजवळ धबधब्याचा प्रचंड मोठा प्रवाह वाहत होता. या प्रवाहातून खोपोलीतील कृष्णा व्हॅली येथील एका कुटुंबातील चौघे जण मार्ग क्रॉस करताना प्रवाहात अडकले होते. याबाबतची माहिती मिळताच रेस्क्यू ऑपेरेशन सुरू करण्यात आले.

# मला जीवे मारण्याची धमकी, दीपेश म्हात्रेंचा आरोप

## डोबिंवलीत पुन्हा महायुतीत शीतयुद्ध?

प्रतिनिधी
■ डोंबिवली

कल्याण डोंबिवलीत महायुतीमधील धुसफूस काही केल्या कमी होताना दिसत नाही. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या वाढदिवशी डोंबिवलीत भाजपला डिवचणारे बॅनर लावण्यात आले होते. "हॅपी बर्थ डे खड्डे", अशा आशयाचे बॅनर डोंबिवलीत झळकले होते. त्यामुळे डोंबिवलीत भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत शितयुद्ध सुरु असल्याचं पुन्हा एकदा समोर आलं होतं. विशेष म्हणजे 'हॅपी बर्थ डे खड्डे' अशा बॅनरची तक्रार विष्णूनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. यानंतर पोलिसांनी गुन्हादेखील दाखल केला होता. या प्रकरणी शिवसेना शिंदे गटाचे युवासेना सचिव दीपेश म्हात्रे यांना नोटीस बजावण्यात आली होती. विष्णूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर जॉली प्रिंटिंग संचालकाच्या जबाबात दीपेश म्हात्रे यांचे नाव समोर आल्याने पोलिसांनी चौकशीसाठी नोटीस बजावली होती.




यानंतर दीपेश म्हात्रे यांनी पोलीस ठाण्यात दाखल होत आपला जबाब नोंदवला होता. याच प्रकरणात आता नवा ट्विस्ट आला आहे. दीपेश म्हात्रे यांनी आपल्याला धमकी दिली जात असल्याचा आरोप केला आहे. दीपेश म्हात्रे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना निवेदन देत आपली भूमिका मांडली आहे. त्यांनी आपल्याला जीवे ठार मारण्याची धमकी देऊन दहशत पसरवण्याबाबत तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे आता हा वाद कुठपर्यंत जाणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. "मी, डोंबिवली विधानसभेतील एका जबाबदार नागरिकाच्या नात्याने आपणास निवेदन करीत आहे की, गेल्या काही दिवसांपासून डोंबिवली विधानसभेतील वातावरण गढूळ करण्याचे कार्य काही लोकांकडून करण्यात येत आहे. हे लोक पक्षाच्या नावाखाली दहशत पसरवून, समाजात दडपशाहीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 9 सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी रद्द

## पालिकेच्या आरोग्य विभागाकडून कारवाई

प्रतिनिधी
■ भाईंदर

मिरा भाईंदर पालिकेच्या आरोग्य विभागाने धडक कारवाई केली आहे. रुग्णांचा आवश्यक तपशील न ठेवल्याने कायद्याचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवत मिरा-भाईंदरमधील ९ सोनोग्राफी केंद्रांचे नोंदणी निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली आहे. यात बड्या रुग्णालयांसह सोनोग्राफी केंद्रांचा देखील समावेश आहे.

मिरा-भाईंदर मनपाच्या आरोग्य विभागाच्या पथकाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे शहरातील प्रसिद्ध रुग्णालय भक्ती वेदांतचा देखील समावेश आहे. मिरा-भाईंदर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाकडून जानेवारी महिन्यात सोनोग्राफी केंद्रांच्या अचानक तपासणीसाठी २० दिवस शहरात विशेष मोहीम शासन आदेशानुसार राबवण्यात आली होती. सोनोग्राफी केंद्रांना रुग्णांची आवश्यक माहिती, रुग्णांचा अहवाल व इतर गोष्टींचा तपशील आदी गोष्टींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. ह्याच अटीवर



त्यांना परवानगी दिली जाते.

मात्र, आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्याकडे ४ रुग्णालयांतील सोनोग्राफी विभागात व ५ सोनोग्राफी केंद्रांनी पालन केले नसल्याचे विशेष पथकाच्या निदर्शनास आले होते. हे पीसीपीएनडीटी व वैद्यकीय गर्भपात कायद्याचे उल्लंघन असल्याने संबंधित रुग्णालयांना नोटीसा बजावत खुलासा मागवण्यात आला होता. यावर त्यांच्याकडून अपेक्षित असे उत्तर प्राप्त न झाल्याने ९ सोनोग्राफी केंद्रांवर अखेर नुकतीच मनपा प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली आहे. मनपाकडून तीन केंद्रांचे एक महिन्यासाठी तर सहा केंद्रांचे आठवडाभरासाठी प्रमाणपत्र निलंबित करण्यात आले आहे.

# लोक अदालतीतून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची वीज ग्राहकांना संधी

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण आणि भांडुप परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित प्रकरणे तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (२८ सप्टेंबर) आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

भांडुप आणि कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुका न्यायालयात २८ सप्टेंबरला सकाळी ११ ते दुपारी दोन दरम्यान राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. या दोन्ही परिमंडलांतर्गत कल्याण एक, कल्याण दोन, वसई, पालघर, वाशी, ठाणे आणि पेण या मंडलातील संबधित ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होण्याबाबत विधी विभागाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. नोटिस मिळाली नसेल तरीही या ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होत आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येणार आहे संबंधित ग्राहकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील तालुका न्यायालयात आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# घोडबंदरच्या बोरिवडे मैदानावर होणार अद्ययावत क्रिडा संकुल !

## आमदार सरनाईक यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी
■ ठाणे

ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील आमदार श्री. प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून घोडबंदर रोड मधील बोरिवडे येथील महानगरपालिकेच्या २० एकर वर असलेल्या मैदानाच्या आरक्षित भुखंडावर अद्ययावत क्रिडा संकुल व सिथेंटिक ट्रॅक उभारण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील क्रिडापट्टू शहरामध्ये सिथेंटिक ट्रॅक असावा अशी मागणी आमदार श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे करीत होते. त्यांच्या मागणीला यश प्राप्त झाले असून राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी नगरविकास खात्यातर्फे रू. ७५ कोटी क्रिडा संकुल उभारण्यासाठी मंजूर केलेले असून त्याचा शासकिय आदेश काढण्यात आलेला आहे. बोरीवडे मैदानाच्या जागेच्या सभोवताली कुंपन भिंत, सुसज्य प्रवेशद्वार त्याचबरोबर क्रिडा संकुलासाठी तळ अधिक एक मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. या क्रिडा संकुलामध्ये इनडोअर क्रिकेट बरोबरच हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॅटमिंटन, स्कॉश कोर्ट, मल्लखांब त्याचबरोबर कबड्डी व कुस्तीसाठी मॅटचाही वापर होणार आहे. हे दोन्ही खेळ मातीत खेळण्यासाठी व मॅटवर खेळण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आलेले आहे. मुंबईतील बी.के. सी. येथील एम.सी.ए. क्लबच्या धर्तीवर विविध इनडोअर खेळ खेळविले जाणार असून भविष्यामध्ये नामवंत प्रशिक्षकांची याठिकाणी व्यवस्था करण्यात येणार आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनेक अँथलेटिक्स पट्टू ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम मध्ये सिथेंटिक ट्रॅक नसल्यामुळे त्यांचा सराव व्यवस्थित होत नसल्यामुळे ते सरावासाठी मुंबईतील सिथेंटिक ट्रॅकवर जात असतात. तेथे जाण्यासाठी त्यांचा प्रवासामध्ये ४ ते ५ तासाचा वेळ जात असल्यामुळे ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये सिथेंटिक ट्रॅक करावा अशी मागणी क्रिडापट्टू वारंवार आमदार श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे करीत होते. आता त्यांच्या मागणीला पुर्णविराम मिळाला असून पुढील महिन्यात या कामाला सुरूवात होणार आहे.

# नवी मुंबई शहरामध्ये आज पाणीपुरवठा बंद

■ नवी मुंबई

जलशुद्धीकरण केंद्र व जलवाहिन्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी उद्या, २६ सप्टेंबर रोजी नवी मुंबई शहरासह कामोठे, खारघरमधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचे भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र व मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरुस्तीसाठी गुरुवारी (२६ सप्टेंबर) सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथील पाणी पुरवठा १० तास बंद ठेवण्यात येणार आहे.



त्यामुळे गुरुवारी संध्याकाळी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात, तसेच कामोठे व खारघर नोडमधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर शुक्रवारी (२७ सप्टेंबर) कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

# 1000हून अधिक नागरिकांनी व स्वच्छताकर्मींनी स्वच्छ केली नवी मुंबईतील 8 विभागातील धार्मिक प्रार्थनास्थळे

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

स्व्च्छता ही सेवा मोहीमे अंतर्गत 17 सप्टेंबर पासून दररोज स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविले जात असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार वर्दळीची ठिकाणे तसेच दुर्लक्षित स्थळांच्या सफाईकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

त्यामुळे या मोहीमेचा प्रारंभही अनंत चतुर्दशीदिनी मोठया प्रमाणात होणा-या गणेश विसर्जन सोहळयानंतर लगेचच दुस-या दिवशी सकाळी सर्व विसर्जन स्थळांच्या सफाई मोहीमेने करण्यात आला. त्यानंतरही खाडी किना-यांवरील खारफुटी परिसर, रेल्वे स्टेशन, एपीएमसी मार्केट अशा विविध स्थळांवर सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात




आल्या. यामध्ये व्यापक लोकसहभागावर भर देण्यात आला व नागरिकांनीही सर्वच मोहीमांना उत्साही प्रतिसाद दिला.

अशाचप्रकारे आज आठही विभाग कार्यालयांमार्फत त्या त्या कार्यक्षेत्रातील धार्मिक प्रार्थनास्थळांची स्वच्छता मोहीम प्रार्थनास्थळांचे पदाधिकारी, तेथील स्वयंसेवक व कर्मचारी तसेच प्रार्थनास्थळाशी संबधित भाविक नागरिक आणि एनएसएसचे विद्यार्थी आणि महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छतामित्र अशा 1050 हून अधिक नवी मुंबईकरांच्या एकत्रित सहयोगातून राबविण्यात आली. प्रार्थनास्थळांमध्ये अंतर्गत स्वच्छतेची काळजी घेतली जाते मात्र त्या सभोवतालच्या परिसर स्वच्छतेकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही.

**पश्चिम रेल्वे**

**विविध संकेत कामे**

**१. कामाचे नाव त्याच्या ठिकाणासह:** मुंबई विभागामधील १०एलसी गेट्सवर आरओबी/आरयूबीच्या तरतुदीकरिता आऊटडोर सिग्नलिंग एक्वीपमेंटचा पुरवठा, बसविणे आणि कार्यान्वीत करणे. **२. अंदाजे कामाचे मूल्य:** रु.९४,११,२९०.९० **३. जमा करायची ईसारा रक्कम:** रु. १,८८,२००.०० **४. निविदा समाप्ती दिनांक आणि वेळ:** २१.१०.२०२४ रोजी १५.०० वाजता. **५. निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** २१.१०.२०२४ रोजी १५.३० वाजता. **६.** संकेतस्थळ तपशील आणि सूचना फलक ठिकाण जेथे पूर्ण तपशील पाहता येईल: संकेतस्थळ **www.ireps.gov.in** उप. मुख्य संकेत आणि दूरसंचार अभियंता, (बांधकाम), यांचे कार्यालय मध्य रेल्वे, टिळक ब्रीजजवळ, दादर, मुंबई-४०००२८, शुद्धीपत्रक (जर असल्यास) केवळ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**निविदा सूचना क्र.**
**डीआर.एन.सी.एस आणि टी. निविदा.२०२४.०९**
**दिनांक: २१.०९.२०२४**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है
426

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता [पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक - ३ ( पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ८५ कामाकरीता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | २६/०९/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०३/१०/२०२४ दुपारी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०७/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ०९/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**CPRO/A/ 750**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

## भरलेली स्कुल बस आणि डांपरच्या अपघातात जीवित हानी नाही

**पुणे :** राज्यात सतत अपघातांच्या घटनेत सातत्याने वाढ होत आहेत. त्यामुळे वाढत्या अपघातामुळे नागरिक चिंता व्यक्त करत आहेत. याचदरम्यान, विद्यार्थ्यांनी भरलेल्या स्कूल बसचा अपघात झाल्याची घटना पुण्यात घडली. या अपघातात सुदैवाने विद्यार्थ्यांना कोणताही दुखापत झाली नाही. या अपघाताचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात डंपरचा गंभीर अपघात होता होता वाचला. पुण्यातील वाघोली लोहगाव रोडवर १० ते १५ मुलांनी भरलेली बस आणि डंपरचा किरकोळ अपघात झाला. सकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास पुण्यातील लोहगाव रोडवर ग्रीन रिपब्लिक सोसायटीसमोर ही अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात कोणीही जखमी झाले नाही पुण्यातील खराडी येथील कोठारी इंटरनॅशनल स्कूलची बस मुले घेण्यासाठी लोहगाव रोडवरील सोसायटीमध्ये आली होती. विद्यार्थ्यांनी भरलेली बस सोसायटीतून बाहेर पडताना बस अर्ध्या रस्त्यावर आली.



### महत्त्वाचे

#### माजी आमदाराच्या वक्तव्यावरून काँग्रेसच्या बैठकीत वाद

**धुळे :** भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय सचिव काझी मोहम्मद निजामुद्दीन यांच्या उपस्थितीमध्ये आयोजित बैठकित काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये झटापट झाली. बैठकीत माजी आमदार डी. एस. अहिरे यांनी मागील निवडणुकीत कार्यकर्त्यांनी विरोधकांना मदत केल्याचे वक्तव्य केले. यावरून वादाला सुरवात झाली होती. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय सचिव व उत्तर महाराष्ट्राचे समन्वयक काझी मोहम्मद निजामुद्दीन हे धुळे दौऱ्यावर आले होते. त्यांच्या उपस्थितीत काँग्रेस भवन येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात साक्री विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार डी. एस. अहिरे यांनी आपले विचार मांडतांना मागील विधानसभा निवडणुकी दरम्यान काँग्रेसचे माजी आमदार अहिरे यांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आपल्याला पाडण्यात विरोधकांना मदत केल्याची खंत व्यक्त केली. यानंतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावर नाराजी व्यक्त केली. यानंतर वाद वाढला. दरम्यान माजी आमदार डी. एस. अहिरे आणि कार्यकर्त्यांमध्ये वाद झाल्याने दोन्ही एकमेकांच्या अंगावर धावून आले.

#### मुलीसोबत शाळेत गैरवर्तन करणारा शिक्षक निलंबित

**हिंगोली :** बदलापूरमध्ये चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराची घटना ताजी असताना आता हिंगोलीमध्ये देखील एका शिक्षकाने शाळेत अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन केल्याचा प्रकार पुढे आला आहे. या घटनेनंतर पालकांनी हिंगोली शहर पोलिसात धाव घेत पोलिसांना या प्रकाराची माहिती दिली आहे. दरम्यान शाळा प्रशासनाने शिक्षकावर तातडीने निलंबनाची कारवाई केली आहे. हिंगोली जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सुरू असलेल्या केदारनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या भारत प्राथमिक विद्यालयात हा सगळा प्रकार घडला आहे. या घटनेनंतर मुलीने घडला प्रकार घरी सांगितल्यानंतर पालकांनी हिंगोली शहर पोलिसात धाव घेत पोलिसांना या प्रकाराची माहिती दिली.

# जरांगेंचे उपोषण 9 व्या दिवशी स्थगित

## मराठ्यांना त्रास देणाऱ्यांना सरळ करण्याचा इशारा; नेत्यांच्या सभेला न जाण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ जालना

मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या 9 व्या दिवशी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाच्या वतीने मला उपोषण न करण्याचा आग्रह करण्यात आला होता. माझ्या माय माऊल्यांनी त्यासाठी मला वारंवार विनंती केली. त्यामुळे आपण उपोषण स्थगित करत असल्याचे मनोज जणांनी पाटील यांनी सांगितले आहे. इतकेच नाही तर ज्यांनी - ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला, त्यांना सोडणार नाही, असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.



राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज एकच असल्याचा दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. या निमित्ताने मराठा समाज एकत्र आला, हे एक चांगले झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आपल्या आंदोलनामुळे मुलींना मोफत शिक्षण मिळाले असल्याचा दावा त्यांनी केला. नेत्यांना आणि त्यांच्या मुलालाच मोठा करू नका. तुमच्या लेकींचे वाटोळ करू नका, मुलींला धोका देऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. एकाही नेत्याच्या सभेला जायचे नाही, असे आवाहन देखील त्यांनी केले. घरी बसून रहा पण नेत्यांच्या सभेला आणि प्रचाराला जाऊ नका, असे आव्हान देखील त्यांनी केले आहे.

मराठा नेत्यांनी एकमेकांना साथ द्या, मराठा समाजाने कोणत्याही नेत्याच्या सभेला जाऊ नका, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मराठा समाजातील माता बहिणी मोठ्या प्रमाणात आंतरवाली सराटी येथे येत आहेत. त्यामुळे राज्यातील मराठा समाजाचे हाल होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. याचबरोबर गावाच्या देखील काही समस्या आहेत. माता भगिनींनी मला उपोषण सोडण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे आता आपण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली आहे. ज्यांनी ज्यांनी मराठा समाजाला त्रास दिला आहे, त्यांनाही इशारा देत त्यांनी सुरुवात केली आहे, त्याचा शेवट मराठाच करणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## जरांगेंपाठोपाठ लक्ष्मण हाकेंनी वडीगोद्रीत सोडलं उपोषण

प्रतिनिधी
■ जालना

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर धनगर आंदोलक लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनीही उपोषण सोडलं आहे. वडीगोद्री येथे ओबीसी महिला आणि मुलींच्या हाताने पाणी घेऊन हाकेंनी उपोषण सोडलं आहे. उपोषणाच्या ७ व्या दिवशी हाकेंनी उपोषण सोडलं.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी आरक्षण सुरु केलं. त्यानंतर काही दिवसांत वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे देखील उपोषणाला बसले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी हक्काच्या संरक्षणासाठी हाकेंनी जालन्यातील वडीगोद्री येथे उपोषणाला सुरुवात केली होती. लक्ष्मण हाके यांनी उपोषणाला सुरुवात केल्यानंतर अनेक नेत्यांनी त्यांची भेट घेतली. अनेक नेत्यांकडून त्यांनी उपोषण सोडावं, यासाठी प्रयत्न केले जात होते.



ओबीसींच्या हक्कांच्या संरक्षणासाठी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी उपोषणाचा मार्ग निवडला होता. गेल्या ७ दिवसांपासून त्यांचं वडीगोद्री येथे उपोषण सुरु होतं. मात्र, आज बुधवारी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडल्यानंतर लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी उपोषण सोडलं.

## रत्नागिरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पहिल्याच वर्षी राज्यात प्रथम

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकतर्फे ऑगस्ट महिन्यात घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष एमबीबीएस परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. येथील शासकीय वैद्यकीयमहाविद्यालयाने पहिल्याच वर्षी९९ टक्के गुण मिळवून राज्यातील सर्व वैद्यकीयमहाविद्यालयांमध्ये प्रथम स्थान पटकावले आहे, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद यांनी दिली.



महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने प्रथम वर्ष एम. बी. बी. एस. परीक्षेचा निकाल मंगळवार, दि. २४ सप्टेंबर रोजी जाहीर केला. यामध्ये राज्यातील पहिल्या ५ वैद्यकीय महाविद्यालयांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी ९९ टक्के, आर्म फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे ९६ टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर, ९५.३० टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर ९५.३० टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर ९५.२० टक्के, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे ९५.१८ टक्के. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एमबीबीएसच्या पहिल्या तुकडीतील शरीररचना शास्त्रात १, शरीरक्रियाशास्त्रमध्ये २ आणि जीवरसायनशास्त्रामध्ये १५ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले आहे. एमबीबीएसच्या पहिल्याच तुकडीने मिळविलेल्या या घवघवीत यशामुळे पालकमंत्री उदय सामंत यांनी विद्यार्थी व अध्यापकांचे विशेष कौतुक केले.

# शाळा सोडून शिक्षक उतरले रस्त्यावर

## कंत्राटी शिक्षक नियुक्ती आदेशाला तीव्र विरोध




प्रतिनिधी
■ नागपूर

आधी शिक्षकांची पदे कमी करणे आणि नंतर कमी पटसंख्या असलेल्या शाळेत कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शिक्षक व बेरोजगारांची नियुक्ती करण्याच्या आदेशाने राज्यभरातील शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. हे दोन्ही निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी टप्प्या-टप्प्याने आंदोलन केल्यानंतर बुधवार २५ सप्टेंबरला राज्यातील हजारो प्राथमिक शिक्षक काम बंद करून सामूहिक रजेवर गेले.

नागपुरात विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह हजारो शिक्षकांनी बुधवारी यशवंत स्टेडियम ते संविधान चौकापर्यंत आक्रोश मोर्चा काढला. या ठिकाणी सभा घेण्यात आली. यावेळी लीलाधर ठाकरे, धनराज बोडे, तुषार अंजनकर, राजकुमार वैद्य, प्रवीण फाळके, अनिल गोतमारे, लीलाधर सोनवने, प्रमोद लोन्हारे, आशुतोष चौधरी, उमाकांत अंजनकर, शरद भांडारकर, परसराम पिल्लेवान, परसराम गोंडाणे, शुद्धोधन सोनटक्के, राम धोटे, जुगलकिशोर बोरकर, मुरलीधर काळमेघ, मिलिंद वानखेडे, विलास भोतमांगे, योगेश कडू आदी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.



*लातूर : राज्यभरातल्या 27 शिक्षक संघटनातील पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत आज राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचे नियोजन केले होते. विद्यार्थी व शिक्षक यांच्यावरील संच मान्यता बाबतचा 15 मार्च 2024 आणि कंत्राटी शिक्षक भरतीचा शासन निर्णय रद्द होणे, आम्हाला शिकवू द्या या प्रमुख मागण्यांसह इतर 22 मागण्यांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी एकत्र आले आहेत. शिक्षकांच्या प्रश्नाबाबत कायमच सरकारी स्तरावर उदासीन भूमिका आहे.*

## सिंदखेडराजात शेतकऱ्याचा बैलगाडा मोर्चा

### महायुती सरकारविरोधी घोषणाबाजी

प्रतिनिधी
■ बुलढाणा

शेतकऱ्यांना पीकविमा मिळावा, सरसकट कर्जमुक्ती करावी यासह अन्य मागण्यांसाठी आज सिंदखेडराजा येथे शेतकऱ्यांचा भव्य बैलगाडा मोर्चा काढण्यात आला. मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले असून शेतकऱ्यांनी सरकार विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली.




शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या मोर्चा माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप वाघ यांच्या नेतृत्वात काढण्यात आला. जिजाऊ राजवाडा येथून या मोर्च्याला सुरुवात करण्यात येऊन सिंदखेडराजा (sindkhedraja) तहसील कार्याल्यावर धडकला. मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. मोर्चामध्ये शेतकरी विरोधी धोरणाचा निर्णय घेणाऱ्या महायुती सरकारचा घोषणाद्वारे निषेध व्यक्त करण्यात आला. यामुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

तहसील कार्यालयावर मोर्चा काढत प्रामुख्याने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, रखडलेली पीक विम्याची रक्कम देण्यात यावी, सोयाबीनला किमान ७ हजार तर कापसाला १२ हजार रुपये भाव द्यावा; या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. तसेच या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

## रत्नागिरीत भरपावसात शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती, विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, अध्यापन सोडून करावी लागणारी प्रशासकीय कामे अशा विविध मुद्द्यांवर राज्यभरातील शिक्षक सामुहिक रजा घेऊन संपावर गेले आहेत. यावेळी रत्नागिरीत भरपावसात जिल्ह्यातील शिक्षकांनी बुधवारी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

संपूर्ण राज्यात शिक्षक संघटनांतर्फे राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले. शालेय शिक्षण विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील शालेय शिक्षणावर विपरित परिणाम होणार असल्याची शिक्षक संघटनांची भूमिका आहे.



त्यामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयांविरोधात प्राथमिक शिक्षकांची काही दिवसांपूर्वी पुण्यात बैठक घेण्यात आली. या बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असलेले व्हॉट्सअॅप समूह सोडणे, काळी फीत लावून काम करणे अशा प्रकारे विरोध दर्शवण्यात आला. त्यानंतर बुधवारी सामुहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

कमी पटाच्या शाळांवर तात्पुरत्या शिक्षकांची नियुक्ती, पुढे त्या शिक्षकालाही काढून टाकल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे. शाळा सुरू होऊन तीन महिन्यांनंतरही कित्येक विद्यार्थी गणवेशाविना आहेत. मिळालेले गणवेश विद्यार्थ्यांच्या मापाचे नाहीत. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसायला बाके नाहीत, काही ठिकाणी पुस्तकेही पोहोचलेली नाहीत, शाळांच्या दुरवस्था आहे. शाळेत पोषण आहारात रोज वेगवेगळे पदार्थ द्यायला सांगून त्यासाठी आवश्यक अनुदान दिले जात नाही. शिक्षकांना शिकवायची इच्छा असताना कागदपत्रे तयार करणे, ऑनलाइन बैठका, सातत्याने माहिती पाठवणे, उपक्रम करण्यात वेळ जातो.

## जिल्ह्याच्या विकासासाठी उद्योग व पर्यटन क्षेत्राच्या वाढीला विशेष चालना द्या - राज्यपाल

### सातारा येथे राज्यपालांनी घेतली प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक

प्रतिनिधी
■ सातारा

सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योग व पर्यटन क्षेत्राच्या वाढीला विशेष चालना द्यावी असे सांगून जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल, स्मार्ट पीएचसी उपक्रमांचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी कौतूक केले. पर्यटन वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये परदेशी पर्यटक आकर्षित करण्यासाठीही प्रयत्न करावेत, असेही निर्देश राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी दिले.

सातारा येथील शासकीय विश्रामगृहात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अधिकाऱ्यांची प्रशासकीय बैठक घेतली. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे स्वागत केले.



सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा, प्रकल्पांचा सखोल आढावा घेत असताना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यटन विकास, बांबू लागवड, महिला सुरक्षा आदी सर्व विषयांबाबत मार्गदर्शन केले. सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या 225 शाळांमध्ये गुणवत्ता आणि दर्जात्मक वाढीसाठी राबविण्यात येत असलेल्या मॉडेल स्कूल या उपक्रमाची माहिती घेतली. या उपक्रमांतर्गत संगणक, प्रयोगशाळा, ग्रंथालय, शौचालय, क्रीडांगण, स्वच्छ पाण्याची सुविधा आदी सर्व पायाभूत सुविधा दर्जेदार देण्यात आहेत. यामुळे काही दशकापासून घसरत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधारणार आहे. 2027 पर्यंत प्रत्येक गावात एक मॉडेल स्कूल करण्यात येणार आहे. याबाबत समाधान व्यक्त करुन अशा प्रकारच्या उपक्रमांबाबत आपण पहिल्यांदाच ऐकत असून हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे, अशा शब्दात त्यांनी या उपक्रमाबाबत कौतूक केले. यावेळी त्यांनी जिल्ह्यात स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जवळपास 13 टक्के कमी आहे. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी अधिक प्रयत्नांची गरजही प्रतिपादित केली.

जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक, धार्मिक, ऐतिहासीक व पर्यावरणपुरक पर्यटन विकास आराखडा राबविण्यात येत असून यासाठी शासनाने 700 कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

## सोलापूर विमानतळाला मंजूरी

■ सोलापूर

सोलापूरकरांसाठी एक महत्वाची बातमी पुढे आली आहे. बहुप्रतीक्षित सोलापूर विमानतळालानागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून लायसन्स मंजूर झाले आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने दिनांक 11 आणि 12 सप्टेंबर 2024 रोजी सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने विमानतळाची पाहणी आणि तपासणी केली होती. यामध्ये विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणाली द्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी डीजीसीए कडून करण्यात आलेली होती. परिणामी, विमान वाहतूक सुरू करण्याच्या अनुषंगाने असलेली सर्व मानके सोलापूर विमानतळ प्राधिकरणकडून पूर्ण करण्यात आलेली असल्यामुळे, आज (25सप्टेंबर रोजी) डीजीसीए कडून सोलापूर विमानतळावरून विमान उडणे आणि उतरण्याचे परवाना (लायसन्स) मंजूर झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

## 'लाडकी बहीण' योजनेसाठी आले चक्क 6 भावांचे अर्ज

### सरकारची आधारकार्ड निलंबित करण्याची कडक कारवाई

प्रतिनिधी
■ अकोला

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला राज्यभरील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत सुमारे दोन कोटीनपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेची नोंदणी अद्यापही सुरूच आहे. अकोल्यात लाडकी बहीण योजनेसाठी 6 भावांनी अर्ज केल्याचा प्रकार समोर आला आहे. या 6 जणांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी खोटी कागदपत्रे जमा केल्याचे तपासात आढळले आहे. या सहा जणांवर महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने कारवाई करण्यात आली आहे.

अकोल्यातील 6 पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी नारी शक्ती दूत ॲपवर खोटी माहिती देत अर्ज भरला. अर्ज छाननीच्या वेळी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली. आता त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.



महिला आणि बालकल्याण विभागाकडून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या या सहा जणांचे आधार कार्ड निलंबित करण्यात आले आहे. या सहा पुरुषांना आधारकार्ड द्वारे कोणताही लाभ मिळणार नाही. तसेच त्यांच्याकडून या प्रकाराबद्दल खुलासा मागवण्यात आला आहे, अशी माहिती अकोला जिल्हा माहिती आणि बालकल्याण अधिकारी गिरीश पुसदकर यांनी दिली आहे.राज्य सरकारच्या वतीने 29 सप्टेंबर रोजी रायगड येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सप्टेंबरपर्यंत अर्ज केलेल्या पात्र लाभार्थी महिलांना तिसऱ्या हप्त्याचे वितरण केले जाणार आहे.

## रोहित पवार बैठकीत मोबाईल, बाटल्या, चाव्या फेकून मारतात

### राम शिंदेंचा खळबळजनक आरोप



प्रतिनिधी
■ बीड

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात सत्ताधारी महायुतीकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असून मागील काही दिवसांत रोहित पवारांच्या काही सहकाऱ्यांनी त्यांची साथ सोडत भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजप नेते आणि विधानपरिषद आमदार राम शिंदे यांची ताकद वाढल्याचं बोललं जात आहे. अशातच आमदार शिंदे यांनी रोहित पवारांवर हल्लाबोल करत ते हुकूमशाही पद्धतीने कारभार करत असल्याचा आरोप केला आहे.

रोहित पवारांवर आरोप करताना राम शिंदेंनी म्हटलंय की, "रोहित पवार यांनी आपल्या सोबतच्या कार्यकर्त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली. त्यांची काम करण्याची पद्धत लोकांना पटलेली नाही. रोहित पवार यांच्या वर्तणुकीमध्ये हुकूमशाही आहे, अरेरावी आहे. ते चालू बैठकीत मोबाईल, पाण्याच्या बाटल्या आणि चाव्या अशा वस्तू फेकून मारतात. मी जर आमदार झालो नसतो तर त्यांनी नक्कीच १०-२० लोकांना मारहाण केली असती. मी विधानपरिषद आमदार झाल्यामुळे त्यांचा पारा अर्ध्यावर आल्याचं लोकांकडून सांगितलं जात आहे," असा दावा शिंदे यांनी केला आहे. "मागील विधानसभा निवडणुकीत माझा ४२ हजार मतांनी पराभव झाला होता. मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराला आमच्या मतदारसंघातून फक्त ९ हजार मतांची आघाडी मिळाली.

## नदीम हारवूड लीग: कलिना रेंजर्सचा मुंबई कस्टम्सवर विजय

**मुंबई :** कुलाब्याच्या कूपरेज मैदानावर खेळवण्यात येत असलेल्या नदीम एमएफए हारवूड फुटबॉल लीग स्पर्धेत कलिना रेंजर्स -सीएएफएफ संघाने मुंबई कस्टम्सवर ३-१ असा शानदार विजय मिळवत आपली विजयी दौड कायम राखली. कलिनाचा कर्णधार शोएब बेगने दोन शानदार गोल नोंदवत संघाला मोठी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर डॉसन रिबेलोने आणखी एक गोल नोंदवत संघाला ३-० अशी मोठी आघाडी मिळवून दिली.मुंबई कस्टम्ससाठी एकमेव गोल प्रणिल याने नोंदवला. कलिनाचा कर्णधार शोएबला 'मॅन ऑफ दि मॅच'पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## मुंबई महानगरपालिका कुस्ती स्पर्धा उत्साहात



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिका माध्यमिक विभाग परिमंडळ क्रमांक एक च्या सन 2024-25 च्या कुस्ती स्पर्धांचे आयोजन सहकार नगर मनपा इंग्रजी शाळा ,वडाळा येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत ११६ मुलगे मुली सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा पुरस्कार विजेते आनंद गायकवाड यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक दत्तू लवटे, सामाजिक कार्यकर्ते शिक्षणतज्ज्ञ चंद्रवीर बंशीधर यादव उपस्थित होते. स्पर्धा १७ वर्ष वयोगट व १२ वजनी गटात खेळवण्यात आल्या. प्रत्येक वजनी गटातील प्रथम चार खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी शाळा किसन पावडे पाटील, समाजसेवी शिक्षणतज्ज्ञ चंद्रवीर बंशीधर यादव, आंतरराष्ट्रीय एनजीओ (मैजिक बस )चे जिल्हा प्रोग्राम मैनेजर देवेंद्र रमाशंकर चौबे उपस्थित होते.

प्रशासकीय अधिकारी किसन पावडे यांनी विद्यार्थ्यी शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना रोख रक्कमही बक्षीस म्हणुन दिली. ते म्हणाले मनपाच्या या कुस्ती स्पर्धेतुनच भविष्यात आंतरराष्ट्रीय खेळाडु निर्माण होतील आणि मुंबई मनपाचे व देशाचे नाव उज्ज्वल करतील ,असा आत्मविश्वास व्यक्त केला. मेहनतीशिवाय यश मिळत नाही. निरंतर प्रयत्न हीच यशाची खात्री असते असा मौलिक सल्लाही विद्यार्थ्यांना दिला. तर चंद्रवीर यादव यांनी सांगितले की, महानगरपालिकेचे शिक्षक प्रचंड मेहनत घेतात .विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी तत्पर असतात.कुस्ती हा बल आणि बुध्दिचा खेळ आहे. शरीर संवर्धनासाठी उपयुक्त आहे. अधिक सराव करुन अंतिम स्पर्धेतही यश संपादन करा असे मनोगत व्यक्त केले.

## भारताच्या लेकींना यंदा टी-20 विश्वविजेतेपदाची सर्वोत्तम संधी!

### ऑस्ट्रेलियालाही टक्कर देण्याचा कर्णधार हरमनप्रीतला विश्वास

प्रतिनिधी
■ मुंबई

आयसीसी' जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी भारतीय महिला संघ यंदा सज्ज झाला असून ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकण्याची आमच्याकडे आता सर्वोत्तम संधी असल्याचे मत कर्णधार हरमनप्रीत कौरने व्यक्त केले. तसेच जेतेपद मिळवायचे झाल्यास बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा अडथळा पार करावा लागू शकेल याची हरमनप्रीतला जाण असली, तरी त्यांचे आव्हान परतवून लावण्याची क्षमता आपल्या संघात असल्याचा विश्वास तिने व्यक्त केला.

संयुक्त अरब अमिराती येथे ३ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघ मंगळवारी मुंबईहून रवाना झाला. त्यापूर्वी विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हरमनप्रीतसह महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार आणि निवड समितीच्या अध्यक्ष नीतू डेव्हिड उपस्थित होत्या.

महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाला २००९ पासून सुरुवात झाली आणि तेव्हापासून भारतीय संघ केवळ एकदाच अंतिम फेरी गाठू शकला आहे. २०२० च्या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्याने भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे



लागले होते. त्यावेळी हरमनप्रीतच भारतीय संघाची कर्णधार होती. तसेच २०१७च्या एकदिवसीय विश्वचषकात अंतिम फेरीत हार पत्करणाऱ्या भारतीय संघातही हरमनप्रीतचा समावेश होता. आता या कटू आठवणी पुसून टाकण्यासाठी हरमनप्रीत सज्ज झाली आहे.

जुलैमध्ये श्रीलंका येथे झालेल्या आशिया चषकात भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्यानंतर भारतीय महिला संघाने स्पर्धात्मक सामना खेळलेला नाही. ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने महिला संघाचे बंगळूरुच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) सराव शिबीर झाले. यात खेळाडूंची तंदुरुस्ती आणि क्षेत्ररक्षण यावर विशेष मेहनत घेण्यात आली.

आपली भूमिका चोख बजावण्याची क्षमता असलेल्या भारतीय संघातील फलंदाजांवर माझा पूर्ण विश्वास असल्याचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार म्हणाले. ''आमच्या अव्वल सहा फलंदाज फार प्रतिभावान आहेत. त्यांच्या फलंदाजीच्या शैलीत विविधता आहे. ही बाब आमच्यासाठी फायदेशीर ठरेल. तिसऱ्या क्रमांकावरील फलंदाजाची भूमिका सर्वांत महत्त्वाची असल्याचे मी मानतो. या क्रमांकावर कोण फलंदाजी करणार हे मला ठाऊक आहे. मात्र, आम्ही सामन्याच्या दिवशीच याचा खुलासा करू,'' असे मुझुमदार यांनी सांगितले. तसेच दुबई येथील खेळट्ट्यांकडून चेंडूला अधिक उसळी मिळेल. यासाठी आम्ही तयार असायला हवे, असेही मुझुमदार म्हणाले.

**मेहनतीचे फळ मिळवण्यासाठी परिश्रम घेणार - हरमनप्रीत**

*''आम्ही आता सर्वोत्तम संघासह विश्वचषकात उतरणार आहोत. या संघातील खेळाडू बऱ्याच काळापासून एकत्रित खेळत आहेत. त्यामुळे आम्हाला एकमेकांची ताकद आणि कच्चे दुवे ठाऊक आहेत. हे आमच्यासाठी फायदेशीर ठरू शकेल. गेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात (२०२३ मध्ये) आम्ही उपांत्य फेरी गाठली होती, पण जेतेपदापासून दूरच राहिलो. यंदा आमच्याकडे विश्वविजेते होण्याची सर्वोत्तम संधी आहे. यापूर्वीच्या स्पर्धांच्या तुलनेत यंदा आमची तयारी अधिक चांगली झाली आहे. आम्ही छोट्या-छोट्या गोष्टींवर काम केले आहे. त्या मेहनतीचे फळ आम्हाला मिळेल अशी खात्री वाटते,'' असे हरमनप्रीतने सांगितले.आशिया चषकात आम्ही चांगले क्रिकेट खेळलो. मात्र, एखाद्या दिवशी काही गोष्टी तुम्हाला हव्या तशा होत नाहीत. तेच आमच्याबाबतीत अंतिम फेरीत घडले. त्यानंतर आम्ही बऱ्याच गोष्टींबाबत चर्चा केली. खेळातील उणिवा दूर करण्याचा आम्ही प्रयत्न केला. आता विश्वचषकात आम्ही सर्वोत्तम खेळ करू आणि जेतेपद पटकावू अशी आशा आहे,'' असे हरमनप्रीतने नमूद केले.*

## एमजेएससी कॅरम स्पर्धेत अर्णव, पृथ्वी, श्रीशान, उमैरची विजयी सलामी




प्रतिनिधी
■ मुंबई

माहीम ज्युवेनाईल स्पोर्ट्स क्लब-एमजेएससी व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित माहीम ज्युवेनाईल चषक आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धेत अर्णव गावडे, पृथ्वी बडेकर, श्रीशान पालवणकर, उमैर पठाण, रेहान शेख आदींनी सलामीचे सामने जिंकले. उद्घाटनीय सामन्यात आर्यन गावडेने अचूक फटक्यांची आतषबाजी करीत प्रियांषु सिंगचे आव्हान १३-० असे संपुष्टात आणले. स्पर्धेचे उद्घाटन एमजेएससीचे उपाध्यक्ष विकास खानोलकर, सेक्रेटरी सुनील पाटील, खजिनदार महेश शेट्ये, माजी क्रिकेटपटू सुरेंद्र बाबरेकर, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर व ओमकार चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

शिवाजी पार्क येथील माहीम ज्युवेनाईल पव्हेलीयनमधील स्पर्धेत मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील शालेय ३२ खेळाडू दर्जेदार खेळाची झलक दाखवीत आहेत. अचूक सोंगट्या घेणाऱ्या बलाढ्य श्रीशान पालवणकरविरुध्द खेळतांना प्रारंभीचा बोर्ड हातचा निसटल्यामुळे बालाजी कथुरोजीगरीचे दडपण वाढले. परिणामी श्रीशान पालवणकरने सलामीचा सामना १९-६ असा जिंकून दुसरी फेरी गाठली.

डावाच्या मध्यापर्यंत चुरशीची लढत देणाऱ्या शुभम परमारला पृथ्वी बडेकरने निर्णायक क्षणी अप्रतिम खेळ करून ७-२ असे चकविले. अन्य सामन्यात उमैर पठाणने जयराज खावादियाचा १९-० असा, कुलदीप चुडासामाने वेदांत पाटणकरचा १३-६ असा, प्रसन्ना गोळेने आयुष दार्वेशीचा १५-१ असा, रेहान शेखने अंश जाधवचा १२-० असा तर नील म्हात्रेने शैलेश यादवचा २५-० असा पराभव करून पहिली फेरी जिंकली.

## गिरनार आंतररुग्णालय क्रिकेट स्पर्धसाठी प्रवेशिका

**मुंबई :** गिरनार चहा पुरस्कृत मुंबई मधील 16 नामांकित हॉस्पिटल संघाचा समावेश असलेल्या मुंबई क्रिकेट असोसिएशन मान्यताप्राप्त क्रिकेट स्पर्धेचे अर्ज भरून देण्याची शेवटची तारीख 5 ऑक्टोबर 2024 असून प्रथम येणाऱ्या 16 संघाना स्पर्धेत खेळण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहे. इच्छुक संघांनी माहिती करिता अनिल बाईकर हिंदुजा हॉस्पिटल यांच्याशी संपर्क साधावा

## 18 वर्षीय द्रोणची 498 धावांची इनिंग: 86 चौकार, 7 षटकार

वृत्तसंस्था
■ गांधीनगर

18 वर्षीय द्रोण देसाईने शालेय क्रिकेट स्पर्धेत एका डावात 498 धावा केल्या आहेत. 450 हून अधिक धावा करणारा तो भारताचा सहावा फलंदाज ठरला आहे. या स्पर्धेचे आयोजन सेंट्रल बोर्ड ऑफ क्रिकेट, अहमदाबाद यांनी केले होते. ही स्पर्धा गुजरात क्रिकेट असोसिएशन अंतर्गत येते.

गांधीनगर येथील शिवाय क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या दिवाण बल्लूभाई कप अंडर-19 मल्टी-डे स्पर्धेत जेएल इंग्लिश स्कूलविरुद्ध द्रोणने ही खेळी खेळली आहे. सेंट झेवियर्सकडून खेळताना त्याने 320 चेंडूंचा सामना केला. द्रोणाच्या या खेळीत 7 षटकार आणि 86 चौकारांचा समावेश होता.



तिसऱ्या क्रमांकावर उतरलेल्या द्रोणने चौकारांमधूनच 386 धावा केल्या.

देसाई 450+ धावा करणारा देशातील सहावा फलंदाज ठरला आहे. याआधी मुंबईचा प्रणव धनवडे (नाबाद 1009), पृथ्वी शॉ (546), डॉ. हवेवाला (515), चमनलाल (नाबाद 506) आणि अरमान जाफर (498) हे एका डावात सर्वाधिक धावा करणारे फलंदाज ठरले आहेत.जानेवारी 2016 मध्ये, भंडारी कपमध्ये खेळताना, प्रणवने केसी गांधी स्कूलसाठी आर्य गुरुकुल (CBSE) विरुद्ध 327 चेंडूत 129 चौकार आणि 59 षटकारांच्या मदतीने ही खेळी खेळली. जी शालेय स्पर्धेतील आतापर्यंतची सर्वात मोठी धावसंख्या आहे. ही खेळी त्याने कल्याण (मुंबई) येथे खेळली.

## आरटीओ कर्मचाऱ्यांचा तीसऱ्या दिवशीही संप सुरुच; संपाला 100 टक्के पाठिंबा

### प्रशासनाने सत्वर तोडगा काढावा अन्यथा लढा तीव्र करण्याचा इशारा

प्रतिनिधी
■ मुंबई

मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने आपल्या प्रलंबित प्रश्नांबाबत पुकारलेल्या बेमुदत संपाला राज्यातून १०० टक्के प्रतिसाद मिळत असल्याचा दावा युनियन ने केला आहे.

मोटार वाहन विभागाचे कार्यालयीन कामकाज ठप्प झाले आहे. कर्मचारी प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीच्या निर्णयावर ठाम आहेत.कर्मचारी भावना आणि उद्रेक लक्षात घेऊन प्रशासनाने सत्वर कार्यवाही करावी, अन्यथा लढा तीव्र करण्यात येईल, असा इशारा मोटार वाहन विभाग (RTO) कर्मचारी संघटना,महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी दिला आहे.

शासन महसूलात होणारी हानी आणि जनसामान्यांच्या वाहन विषयक निकडीची कामे यांचा विचार करता आर्थिक बोजा नसलेल्या मागण्यांवर मार्ग काढावा ही संघटनेची ठाम भूमिका आहे. २४ सप्टेंबर २०२४ पासून सुरु झालेल्या बेमुदत संपाचा आज तिसरा दिवस आहे.

२३ सप्टेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मंजूर झालेल्या आकृतीबंधाची अंमलबजावणी न झाल्याने कर्मचारी प्रचंड तणावात आहेत. तसेच पदोन्नतीचे सत्रच थांबविले असल्याने आर्थिक आणि सामाजिक नुकसान झाल्यानेही प्रचंड असंतोष आहे. आकृतीबंधाची अंमलबजावणी आणि महसूल स्तरावरील बदल्यांना प्रचंड विरोध आहे. प्रशासन मात्र महसुली स्तरावर बदल्यांसाठी ठाम आहेत. त्यामुळेही कर्मचारी प्रचंड नाराज आहेत. असेही सुरेंद्र सरतापे यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावा - राज्यपाल



प्रतिनिधी
■ मुंबई

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जीवनात मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावा, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. वेळ ही अमूल्य बाब असून आयुष्यात त्याचा योग्य वापर करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचा वार्षिक दीक्षांत समारंभ मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर सभागृहात झाला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते पीएचडी, पदव्युत्तर पदवी तसेच पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, पदक देऊन सत्कार करण्यात आला.

भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूरचे संचालक भिमराया मेत्री, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रजनीश कामत यावेळी उपस्थित होते. राज्यपालांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले, ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व घडविणे हे शासनाच्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे आपल्याला शिक्षित करण्यामध्ये शिक्षक आणि पालकांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेतील आपण महत्त्वाचा घटक असून आयुष्याच्या पुढील वाटचालीत आपणही आपले कर्तव्य पार पाडून समाजासाठी योगदान द्यावे. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर आपल्याला जगाशी स्पर्धा करायची असून क्वचित अपयश आले तरीही खचून न जाता ज्ञानाच्या पाठबळावर एकाग्रतेने काम करा, यश नक्की मिळेल, असा सल्ला त्यांनी दिला. श्री. मेत्री यांनी आयुष्यात केवळ स्वतःला ओळखणे नव्हे तर सिद्ध करणे महत्त्वाचे असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी अपयशाची भीती न बाळगता मोठी स्वप्ने पाहावीत आणि वेगळी कामगिरी करून दाखवण्याची जिद्द ठेवावी, असे सांगितले. दीक्षांत समारंभात विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन, मानवता विद्या शाखा, आंतरविद्या शाखा अशा विविध शाखांमधून १ हजार १३० पदवीधरांना पदवी प्रदान करण्यात येत असून त्यापैकी ७७८ पदवीधर, ३४१ पदव्युत्तर आणि ११ जणांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

## गांधी जयंती दिनी नेहरू सेंटरच्या वतीने गांधीजींच्या भजनांची संध्या

प्रतिनिधी
■ मुंबई

नेहरू सेंटरने महात्मा गांधी यांच्या जयंतीचे निमित्त साधून 'संतवाणी' एक भक्तिमय संगीत संध्या या कार्यक्रमाचे आयोजन २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता नेहरू सेंटरमध्ये करण्यात आले आहे. विनायक चेऊलकर, श्रीरंग परब, संदीप मयेकर, कुणाल पाटील, गौतम नाईक यांची संगीत साथ या कार्यक्रमाला लाभणार आहे. २७ सप्टेंबर पासून सकाळी १०.३० वाजल्यापासून प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेशिका नेहरू सेंटरच्या तिकीट खिडकीवरती उपलब्ध होणार आहेत.

या कार्यक्रमाचा 'सुर नवा ध्यास नवा' या रियालिटी शोच्या निमित्ताने



घराघरात पोहोचलेल्या प्रशांत काळुंद्रेकर यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले आहे. शिवाय मराठी आणि हिंदी चित्रपटासाठी गायिका म्हणून परिचयाच्या असलेल्या मोना कामत -प्रभूगावकर यांचा सुद्धा या कार्यक्रमात गायिका म्हणून सहभाग असणार आहे. मेघना काळुंद्रेकर काही गीते सादर करणार आहेत. निवेदनाची जबाबदारी दिलीप जोशी यांच्यावर सोपवली आहे.

## विक्रोळीच्या विकास कॉलेजमध्ये सिंगिंग स्टार स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

पिक्सेल एंटरटेनमेंट आणि सुमन पांडुरंग स्मृती फाऊंडेशन, विकास कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, विक्रोळी यांच्या संयुक्त विद्यमाने सिंगिंग स्टार 2024 या गायन स्पर्धेचे आयोजन शनिवार व रविवार दिनांक 21 व 22 सप्टेंबर रोजी करण्यात आले

अंतिम फेरी रविवारी सायंकाळी 6 ते रात्री 9 या वेळेमध्ये ख्यातनाम पार्श्वगायक दादूस आणि कविता राम यांच्या उपस्थितीत स्पर्धा पार पडली .प्रथम गट 11 ते 14 वर्षे प्रथम विजेता स्वरा जोशी , द्वितीय स्वरा पाटील , तृतीय - मृणाल जवंजाळ तर द्वितीय गट 15 ते 18 वर्षे प्रथम विजेता आदित्य सारंग व तृतीय गट 19 वर्षे प्रथम क्रमांक ज्योती जयस्वाल ,




द्वितीय क्रमांक शुभराज गुरवाले , तृतीय क्रमांक - प्रियंका खवळे या स्पर्धकांनी अटीतटीच्या स्पर्धेमध्ये यश मिळवले.

विद्या विकास एज्युकेशन सोसायटीच्या सल्लागार डॉक्टर अनघा राऊत यादेखील सदर कार्यक्रमाला उपस्थित होत्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन भविष्यातील संगीत क्षेत्रातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मुंबई व ठाणे जिल्ह्यातील विविध विभागातून स्पर्धक या स्पर्धेमध्ये उत्साहाने सहभागी झाले होते

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कल्याण कार्यालयाने जप्त केला 1.45 टन सिंगल युज प्लास्टिकचा साठा

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या निर्देशास अनुसरुन व सदस्य सचिव डॉ.अविनाश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात बंदी असलेल्या सिंगल युज प्लास्टिकचे अवैध उत्पादन करणाऱ्या उद्योगांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. या मोहिमेअंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कल्याण कार्यालयास कल्याण जवळील म्हारळ या गावात अवैध सिंगल युज प्लास्टिकचे उत्पादन केले जात असल्याबद्दल माहिती प्राप्त झाली होती. याची तात्काळ दखल कल्याण कार्यालयाने घेऊन प्रादेशिक अधिकारी राजेंद्र राजपूत, उपप्रादेशिक अधिकारी उपेंद्र कुलकर्णी व सीमा



दळवी यांच्या पथकाने नुकतीच मे.नेहा प्लास्टिक, स्वरुप कपांऊड म्हारळ,ता.कल्याण,जि.ठाणे या सिंगल युज प्लास्टिकचे अवैध उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकली असता सदरहू कारखान्यात प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या तयार करण्याचे काम सुरु असल्याचे आढळून आले.

धाडी दरम्यान म.प्र.नि.मंडळाने विचारणा केली असता सदरहू उद्योगाकडे कारखाना सुरु करण्याचे कोणतेही संमती पत्र उपलब्ध नसल्याचे लक्षात आले. या धाडी दरम्यान सदरहू उद्योगाकडून १.४५ टन प्लास्टिक कॅरी बॅग्ज् व इतर अवैध प्लास्टिक घटक जप्त करण्यात आले. सदरहू जप्त केलेले प्लास्टिक म्हारळ ग्रामपंचायत यांच्याकडे सुपुर्द केले असून सदरहू जप्त केलेल्या प्लास्टिकची योग्य ती विल्हेवाट लावण्यात येणार आहे.

## आपापल्या धर्मातील शांती संदेश धर्मगुरूंनी समाजात रुजवावा

### ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन

■ मुंबई

देशात धार्मिक विद्वेषाचा वनवा पेटवून त्यावर राजकीय पोळ्या भाजण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून विविधतेने नटलेल्या आपल्या देशातील सामाजिक सलोखा धोक्यात आला आहे. अशा वेळी सर्व धर्मातील धर्मगुरूंनी आपापल्या धर्मातील शांतीचासंदेश समाजात रुजवून विद्वेषाचा वनवा शांत करावा, असे आवाहन वारकरी विचार मंचचे अध्यक्ष ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित सर्व धर्मीय सद्भावना संमेलनात ते बोलत होते. या संमेलनाला विविध धर्मातील धर्म गुरू मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना शामसुंदर महाराज पुढे म्हणाले की, ज्या वेळी धर्माचा आधार घेऊन स्वार्थासाठी सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचे प्रयत्न होतात. सच्चा



धर्माच्या विचारांना बाजूला सारून धर्माच्या नावाने पाखंडीपणा केला जातो तेव्हा खऱ्या धार्मिकांना त्या पाखंडाचं खंडन करून खऱ्या धर्माच रक्षण करावं लागतं. आज धर्माच्या नावाने जो उच्छाद मांडला जात आहे, विद्वेषाचा वणवा भडकवला जात आणि त्यावर आपल्या राजकीय पोळ्या भाजण्याचे प्रयत्न केले जात आहेत. कोणताही धर्म विद्वेषावर आधारलेला नसतो तर प्रेम हीच धर्माची शिकवण असते.असेही शामसुंदर महाराज म्हणाले.

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**बांधकाम विभाग, प्र.स.क्रं १**

**ई-निवीदा सुचना क्रमांक ९० सन २०२४/२५**
**जनरल निधी अंतर्गत सन २०२४-२५**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म दिनांक २६/०९/२०२४ ते दि.:- ०३/१०/२०२४ पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदापत्राची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्रं.१ च्या कार्यक्षेत्रातील आय.जी.एम. उदयानात अग्निशमन दलाच्या इमारतीत आपत्ती निवारण करणा-या कर्मचारी करीता, तसेच उदयानातील साहित्य ठेवणे करीता स्वतंत्र कॅबिन बांधुन मिळणे तसेच उदयानातील रिंग फिनीसींग करुन पेव्हर ब्लॉक बसवुन मिळणेबाबत. | ९,९६,३६३/- | २३६०/- |

वरील ऑनलाईन निविदा दि. ०३/१०/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. तसेच सदरची निविदा ही दि. ०४/१०/२०२४ रोजी संध्या. ४.०१ अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोईप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यात येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकीय इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जा.क्र. /ज.सं.वि./१२९७
दिनांक : २५/०९/२०२४

## चीनने आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी केली

**बीजिंग :** चीनने बुधवारी इंटर-कॉन्टिनेंटल बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची (ICBM) यशस्वी चाचणी केली. या क्षेपणास्त्रात बनावट वॉरहेड बसवण्यात आले होते. बीबीसीच्या मते, 1980 नंतर चीनने प्रशांत महासागरात ICBM क्षेपणास्त्राची चाचणी घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. सकाळी 8.44 वाजता क्षेपणास्त्र सोडण्यात आले. चीनच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, हे क्षेपणास्त्र ज्या ठिकाणी अपेक्षित होते. त्याच ठिकाणी समुद्रात पडले. हा चीनच्या वार्षिक प्रशिक्षणाचा भाग आहे. मात्र, या क्षेपणास्त्राची वैशिष्ट्ये आणि त्याचे प्रक्षेपण करण्याचे ठिकाण याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही. चीनचे सरकारी मीडिया शिन्हुआ यांनी सांगितले की, क्षेपणास्त्र चाचणीपूर्वीच आसपासच्या देशांना याची माहिती देण्यात आली होती. मात्र, जपानने याला नकार दिला आहे. आतापर्यंत, चीन नेहमीच आपल्या ICB क्षेपणास्त्रांची देशातच चाचणी करत आहे. आतापर्यंत हे शिनजियांग प्रदेशातील तकलामाकान वाळवंटात केले जात होते.



# जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळावा यासाठी रस्त्यावर उतरू

### राज्याचा दर्जा हिसकावून केंद्रशासित प्रदेश बनवले, असे भारताच्या इतिहासात कधीच घडले नाही

वृत्तसंस्था
श्रीनगर

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी जम्मू येथे सांगितले की, विधानसभा निवडणुकीनंतर केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा दिला नाही, तर इंडिया ब्लॉक संसदेत आपली पूर्ण ताकद वापरेल आणि गरज पडल्यास रस्त्यावरही उतरतील.



राहुल येथे एका सभेला संबोधित करत होते. ते म्हणाले की 2019 मध्ये जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन झाले तेव्हा येथील लोकांवर खूप अन्याय झाला. भारताच्या इतिहासात असे कधीही घडले नाही की आपण कोणत्याही राज्याचे राज्यत्व काढून त्याचे केंद्रशासित प्रदेशात रूपांतर केले आहे.

राहुल गांधी यांचा तीन आठवड्यातील जम्मू-काश्मीरचा हा तिसरा दौरा आहे. यापूर्वी 4 सप्टेंबर रोजी त्यांनी बनिहाल आणि डोरूला भेट दिली होती, तर 23 सप्टेंबर रोजी त्यांनी सुरनकोट आणि मध्य-शालतेंगला भेट दिली होती. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान होत आहे.

बारामुल्लामध्ये राहुल म्हणाले- निवडणुकीपूर्वी जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल व्हावा, अशी आमची इच्छा होती. राज्याचा दर्जा बहाल केल्यानंतर निवडणुका व्हाव्यात, अशी जम्मू-काश्मीरमधील सर्व जनतेची इच्छा होती... पण तसे झाले नाही, पहिली पायरी म्हणजे निवडणुका.

मात्र, त्यानंतर जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करावा लागेल. यासाठी इंडिया ब्लॉक संसदेत पंतप्रधान मोदींवर दबाव आणणार आहे. त्यांनी तसे न केल्यास, केंद्रात इंडिया ब्लॉकचे सरकार बनताच आम्ही तुमचे राज्यत्व पुनर्स्थापित करू. दोन दिवसांपूर्वी राहुल सुरनकोटमध्ये म्हणाले होते – 56 इंच छाती असलेले नरेंद्र मोदी आता पूर्वीसारखे राहिले नाहीत. मी लोकसभेत त्यांच्यासमोर उभा आहे. त्यांचा आत्मविश्वास संपल्याचे मला स्पष्टपणे दिसत आहे. ते कायदे आणतात, आम्ही त्यांच्यासमोर उभे आहोत, त्यांना कायदे करणे जमत नाही. राहुल म्हणाले की, पंतप्रधान मोदींचा आत्मविश्वास कमी झाला आहे. आज विरोधकांना जे काही करायचे आहे, ते ते करून दाखवतात. भाजप भावांना भांडायला लावते.

**भाजपवर द्वेष पसरवल्याचा आरोप**

भाजपचे लोक जम्मू-काश्मीर आणि उर्वरित राज्यात 24 तास द्वेष आणि हिंसाचार पसरवतात. त्यांना दुसरे काही कळत नाही. त्यांना फक्त द्वेष कसा पसरवायचा हे माहित आहे. त्यांचे राजकारणही द्वेषाचे राजकारण आहे. तुम्हाला माहीत आहे, द्वेषाला द्वेषाने उत्तर दिले जाऊ शकत नाही.

हे लोक वाटण्याचे काम करतात. ते कुठेही गेले तरी एका जातीविरुद्ध, एका धर्माविरुद्ध, भांडणाच्या चर्चा करतात. हे लोक गुर्जर भाईंना भांडण लावण्याचाही प्रयत्न करतात. त्यांचा हा प्रकल्प फसणार आहे. सर्वांना सोबत घेऊन सर्वांना त्यांचे हक्क देऊन आम्ही पुढे जाऊ. द्वेष फक्त प्रेमाने कमी केला जाऊ शकतो. त्यामुळे ही विचारधारांची लढाई आहे, एका बाजूला द्वेष पसरवणारे लोक आहेत, तर दुसरीकडे प्रेम पसरवणारे लोक आहेत. आमचा संदेश असा आहे की द्वेषाने कोणाचेही भले होत नाही. द्वेषाच्या बाजारात आम्ही प्रत्येक राज्यात प्रेमाचे दुकान उघडले, असेही राहुल म्हणाले.

# माझे विधान फक्त सैन्य मागे घेण्याबाबत होते, इतर मुद्द्यांवर आव्हान कायम



### चीनसोबतचा 75% वाद संपल्याविषयी जयशंकर यांचे स्पष्टीकरण

वृत्तसंस्था
न्यूयॉर्क

भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चीनसोबतचे 75% वाद सोडवल्याबद्दलच्या विधानाबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी मंगळवारी सांगितले की, ते जे काही बोलले ते केवळ सैन्याच्या माघारीबाबत होते.

परराष्ट्र मंत्री म्हणाले की, चीनसोबत इतर मुद्द्यांवर अजूनही आव्हाने आहेत. जयशंकर म्हणाले की, चीनसोबतचा भारताचा इतिहास अडचणींनी भरलेला आहे. न्यूयॉर्कमधील एशिया सोसायटी पॉलिसी इन्स्टिट्यूटमध्ये ते बोलत होते.

जयशंकर म्हणाले की, एलएसीबाबत चीनसोबत आमचा स्पष्ट करार आहे. परंतु 2020 मध्ये कोरोना महामारीच्या काळात अनेक सैनिक तैनात करून त्यांनी कराराचे उल्लंघन केले. यानंतर काही दुर्घटना घडण्याची भीती होती आणि ते घडले. हाणामारी झाली आणि दोन्ही बाजूंच्या लोकांची जीवितहानी झाली.

जयशंकर म्हणाले की, चीनच्या या निर्णयाचा दोन्ही देशांतील संबंधांवर परिणाम झाला. ते म्हणाले की, आता आम्ही संघर्षाच्या ठिकाणांवरील वादविवादाची बहुतांश प्रकरणे सोडवण्यात सक्षम झालो आहोत. पण पेट्रोलिंगशी संबंधित काही समस्या सोडवणे आवश्यक आहे. आता पुढची पायरी ताण कमी करणे असेल. परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनी 12 सप्टेंबर रोजी जिनिव्हा येथे झालेल्या शिखर परिषदेत सांगितले होते की, चीनसोबतच्या सीमा चर्चेत भारताला यश मिळत आहे आणि सुमारे 75% विवादांचे निराकरण झाले आहे. सीमेवर दोन्ही देशांचे सैन्य समोरासमोर उभे राहणे हा मोठा मुद्दा आहे, असे ते म्हणाले होते. सीमा विवाद मिटला तर भारत-चीन संबंधात सुधारणा शक्य आहे.

जयशंकर म्हणाले होते की 2020 मध्ये चीन आणि भारत यांच्यातील गलवान संघर्षाचा दोन्ही देशांमधील संबंधांवर वाईट परिणाम झाला होता. सीमेवर हिंसाचार झाल्यानंतर इतर संबंधांवर त्याचा परिणाम होणार नाही, असे कोणीही म्हणू शकत नाही.

पान ९ वरुन

### लोकसभेतील पराभवाचा डाग पुसून टाका

त्या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राज्याच्या दौऱ्यावर आले असून पदाधिकाऱ्यांच्या बैठक घेत आहेत. नाशिक येथे नुकतीच सभा पार पडली. यावेळी त्यांनी ठाकरे गट, शरद पवार गट आणि कॉंग्रेसच्या मतदारांना भाजपशी जोडावेत अशा सूचना कार्यकर्त्यांना केल्या आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपची सत्ता येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### राज्यातलं सरकार बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही - शरद पवार

त्याचा आवाज दाबला जातो. राजकारण हे समाजकारणाला स्थान देणारे पाहिजे. येथील चित्र बदलत आहे. लोकसभा निवडणुकीत तेच दिसले. देशाचे पंतप्रधान सांगत होते, आम्ही ४०० पार निवडून येणार, पण त्यांचे किती खासदार आले. राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या, त्यापैकी ८ जागा जिंकून आणल्या. आमच्या नावावर निवडून आले आणि मग भाजपासोबत सत्तेत जाऊन बसले, लोकांची फसवणूक या लोकांनी केली आणि सत्तेमध्ये सहभागी झाले. ही तर फक्त सुरुवात आहे. परळीमध्ये मोठी सभा आपण घेऊ आणि दाखवून देऊ. आता फक्त दोन महिने राहिले आहेत. राज्यात सरकार बदलल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे शरद पवार म्हणाले. दरम्यान, राजेभाऊ फड यांचा परळी मतदारसंघात चांगला जनसंपर्क आहे. त्यांना उमेदवारी दिली तर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यासमोर राजाभाऊ फड यांचे आव्हान राहू शकते. त्यातच, शरद पवारांनी या पक्षप्रवेशावेळी तसे संकेतही दिले आहेत. तसेच विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी परळीत विशेष लक्ष दिल्याचे स्पष्ट केले आहे.

### उद्योग, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्य व केंद्र शासन हे शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत शेतकऱ्यांना 6 हजार रुपये मिळतात. राज्य शासन त्यात आणखी सहा हजार देत आहे. तसेच एक रुपयात पीक विमाही राज्य शासन देत असून त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. बदलापूरमधील घटनेतील आरोपीच्या मृत्यूची चौकशी सुरू असून दोषींवर कारवाई होईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# देशाच्या कोणत्याही भागाला पाकिस्तान म्हणता येणार नाही - सरन्यायाधीश चंद्रचूड

- कर्नाटक HCच्या न्यायाधीशांची माफी स्वीकारली
- बंगळुरूच्या मुस्लीम भागाला पाकिस्तान म्हटले होते

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



कोणत्याही समाजावर भाष्य करताना निष्काळजीपणा करू नका, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी न्यायाधीशांना दिले. CJI DY चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या वादग्रस्त टिप्पण्यांबाबत सुनावणी सुरू होती. ज्यामध्ये न्यायाधीशांनी बंगळुरूच्या एका भागाला पाकिस्तान म्हटले होते.

CJI म्हणाले की, तुम्ही देशाच्या कोणत्याही भागाला पाकिस्तान म्हणू शकत नाही. हे देशाच्या एकात्मतेच्या मूलभूत तत्त्वाच्या विरोधात आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्ही श्रीशानंद यांच्या या टिप्पणीचा व्हिडिओ व्हायरल झाला, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेच या प्रकरणाची सुनावणी सुरू केली.

यावर CJI म्हणाले, 'न्यायालय प्रक्रियेत जास्तीत जास्त पारदर्शकता आणण्यासाठी ती जास्तीत जास्त प्रकाशात आणण्याची गरज आहे. न्यायालयात जे काही घडते ते दडपले जाऊ नये. पारदर्शकतेचे उत्तर म्हणजे दरवाजे बंद करून सर्व काही बंद करणे हे नाही. यानंतर न्यायमूर्ती श्रीसनंदन यांनी सर्वोच्च न्यायालयाची माफी मागितली. CJI खंडपीठाने माफीनामा स्वीकारून प्रकरण बंद केले आहे.

निष्काळजी टिप्पण्या एखाद्या व्यक्तीचे पक्षपाती विचार प्रकट करतात, विशेषत: जेव्हा ते विशिष्ट लिंग किंवा समुदायावर केले जातात. सुनावणीदरम्यान, न्यायाधीशांनी कोणत्याही समुदायाच्या विरोधात किंवा त्यास हानिकारक असलेल्या अशा टिप्पण्या टाळल्या पाहिजेत.

कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती या खटल्यात पक्षकार नव्हते, आम्ही आत्ताच अधिक काही बोलणार नाही, परंतु समुदाय आणि लिंगावर केलेल्या टिप्पण्यांबद्दल आम्ही गंभीरपणे चिंतित आहोत. अशा टिप्पण्या नकारात्मक प्रतिमा तयार करतात. ते न्यायालय आणि संपूर्ण न्यायव्यवस्थेवरही परिणाम करतात. आम्ही हे प्रकरण बंद करत आहोत, परंतु इलेक्ट्रॉनिक युगाच्या युगात न्यायाधीश आणि वकिलांनी योग्य भाष्य केले पाहिजे आणि या युगानुसार त्यांचे वर्तन जुळवून घेतले पाहिजे. न्याय्य असणे हा न्यायाचा आत्मा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

# सेबी बोर्डाची बैठक 30 सप्टेंबरला

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सिक्युरिटी एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात SEBI च्या प्रशासकीय मंडळाची बैठक 30 सप्टेंबर रोजी होणार आहे. त्यात इंडेक्स डेरिव्हेटिव्हजसह अनेक बाबींवर चर्चा होणे अपेक्षित आहे. बाजार नियामक सेबी दीर्घ काळापासून इंडेक्स डेरिव्हेटिव्ह फ्रेमवर्क मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

नवीन फ्रेमवर्कचा सिक्युरिटीज मार्केटवर लक्षणीय परिणाम होईल. किरकोळ गुंतवणूकदारांच्या डेरिव्हेटिव्हजमधील व्यापारात झटपट नफा कमी होईल. SEBI ने 30 जुलै रोजी या संदर्भात सल्ला पत्र जारी केले होते. सेबीच्या प्रस्तावात, सुरुवातीला किमान करार मूल्य 15-20 लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचे म्हटले होते. नंतर ती वाढवून 20-30 लाख करण्याची योजना होती. स्ट्राईक किमतींसंबंधीचे नियम बदलण्याचीही चर्चा होती.अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि SEBI प्रमुख माधबी पुरी बुच यांनी F&O मधील किरकोळ गुंतवणूकदारांच्या वाढत्या स्वारस्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

# पॅरासिटामॉलसह 53 औषधे क्वालिटी टेस्टमध्ये फेल

नवी दिल्ली

पॅरासिटामॉलसह 53 औषधे क्वालिटी टेस्टमध्ये फेल झाली आहेत. जीवनसत्त्वे, शुगर आणि रक्तदाबाच्या औषधांशिवाय प्रतिजैविकांचाही समावेश आहे. देशातील सर्वात मोठी औषध नियामक संस्था सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (CSDSO) ने त्यांची यादी प्रसिद्ध केली आहे.

CSDSO च्या यादीत व्हिटॅमिन C आणि D3 टॅब्लेट शेल्कल, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि व्हिटॅमिन सी सॉफ्टजेल, अँटिआसिड पॅन-डी, पॅरासिटामोल गोळ्या IP 500MG, मधुमेहावरील औषध ग्लिमेपिराइड आणि उच्च रक्तदाब औषध टेलमिसार्टन देखील क्वालिटी टेस्टमध्ये फेल झाले.

बंदी असलेल्या औषधांच्या यादीमध्ये क्लोनाझेपम टॅबलेट, वेदनाशामक डायक्लोफेनाक, श्वसन रोगांसाठी वापरल्या जाणाऱ्या अँब्रोक्सोल, फंगलविरोधी फ्लुकोनाझोल आणि काही मल्टीविटामिन आणि कॅल्शियम गोळ्यांचा समावेश आहे. ही औषधे हेटेरो ड्रग्स, अल्केम लेबोरेट्रीज, हिंदुस्तान एंटीबायोटिक्स लिमिटेड (HAL), कर्नाटक अँटिबायोटिक्स अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेड यांसारख्या बड्या कंपन्या बनवतात.

# कंगना बॅकफूटवर, कृषी कायद्यांवरील विधान मागे

### कोणी निराश झाले असेल तर माफ करा; भाजपने अंग झटकले होते

वृत्तसंस्था
चंदीगढ

3 कृषी कायदे पुन्हा लागू करण्याबाबत अभिनेत्री कंगना राणौत बॅकफूटवर आली आहे. तिने एक व्हिडिओ जारी करून आपले वक्तव्य मागे घेतले आहे. म्हटले- माझ्या विधानाने कोणी निराशा झाली असेल तर मी माझे शब्द मागे घेते.

कंगनाच्या वक्तव्यावर विरोधक भाजपला कोंडीत पकडण्यात व्यस्त असतानाच कंगनाने तिच्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान आलेल्या कंगनाच्या वक्तव्यापासून भाजपनेही स्वतःला दूर केले होते. भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी व्हिडिओ जारी केला असून कंगनाला 3 कृषी कायद्यांवर बोलण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले आहे.

गौरव भाटियांनी व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, 'भाजप खासदार कंगना रणौतचे 3 कृषी कायद्यांबाबतचे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हे कायदे यापूर्वीच मागे घेण्यात आले आहेत. मला स्पष्टपणे सांगायचे आहे की हे विधान कंगना रणौतचे वैयक्तिक आहे. कंगना भाजपच्या वतीने असे कोणतेही विधान करण्यास अधिकृत नाही किंवा तिचे विधान पक्षाच्या विचारसरणीचे नाही. त्यामुळे आम्ही त्या विधानाचे खंडन करतो.

दोन दिवसांपूर्वी हिमाचलमध्ये एका कार्यक्रमादरम्यान मीडियाशी बोलताना कंगनाने 3 कृषी कायदे पुन्हा लागू करण्याची मागणी केली होती. या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी शेतकऱ्यांनीच करावी, असे कंगनाने म्हटले होते. 14 महिन्यांच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर नोव्हेंबर 2021 मध्ये केंद्र सरकारने हे कायदे मागे घेतले होते.

# स्विगीला IPO लाँच साठी मिळाली SEBI ची मंजुरी

नवी दिल्ली

ऑनलाइन फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म स्विगीला IPO लाँच करण्यासाठी सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI) कडून मंजुरी मिळाली आहे. स्विगीने एप्रिलमध्ये इनिशियल पब्लिक ऑफर (IPO) साठी SEBI कडे मसुदा कागदपत्रे सादर केली होती.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, कंपनी या वर्षी नोव्हेंबरमध्ये हा IPO लाँच करू शकते. स्विगी याद्वारे 1.25 लाख कोटी रुपयांच्या मुल्यांकनात 11 हजार कोटींहून अधिक निधी उभारण्याची योजना आखत आहे. 5000 कोटी रुपयांचे नवीन शेअर्स असतील. यापूर्वी, स्विगीने आपल्या IPO द्वारे सुमारे $1.25 अब्ज (सुमारे 10 हजार कोटी) उभारण्याचे लक्ष्य ठेवले होते. यापैकी सुमारे 3,750 कोटी रुपये नवीन शेअर्सच्या विक्रीतून आणि 6,664 कोटी रुपये ऑफर-फॉर-सेल (OFS) द्वारे उभारले जाणार होते.

# IIM बँगलोरच्या पदवीधराने मॅट्रिमॉनियल वेबसाइटवरुन केली 16 तरुणींची फसवणूक

वृत्तसंस्था
बंगळुरु

मॅट्रिमोनिअल साइट्सवरून संपर्क साधून महिलांची फसवणूक करण्यात आल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. एवढंच नाही तर अशा प्रकारच्या साइट्सवरून आर्थिक फसवणूक झाल्याचे अनेक प्रकारही पाहायला मिळतात. आता असाच एक धक्कादायक प्रकार उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडामध्ये घडला आहे. मेट्रिमोनियल साईटवरून एका व्यक्तीने तब्बल १६ तरुणींची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. यानंतर पोलिसांनी फसवणूक करणाऱ्या तरुणाला अटक केली आहे. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

आयआयएम बेंगळुरूमधून शिक्षण घेतलेल्या एका पदवीधर तरुणाने मॅट्रिमोनिअल साइट्सवरून ओळख करत १६ महिलांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी मंगळवारी आरोपीला अटक केली. २०२१ मध्ये या ३९ वर्षीय व्यक्तीने आपली नोकरी गमावलेली होती. हा व्यक्ती ग्रेटर नोएडामधील बिसरख येथील राधा स्काय गार्डन सोसायटीमध्ये वास्तव्यास होता. राहुल चतुर्वेदी असं या व्यक्तीचं नाव आहे. या राहुल चतुर्वेदीने मॅट्रिमोनिअल साइट्सवर बनावट प्रोफाइल तयार केलं होतं. तसेच अशा प्रकारची बनावट प्रोफाइल तयार करून १६ पेक्षा जास्त महिलांसह ८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला आहे. यासंदर्भातील वृत्त इंग्रजी दैनिकाने दिलं आहे.

# बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांना भारतरत्न किताब देवून त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा - केंद्रीय राज्यमंत्री आठवले

वृत्तसंस्था
नवी दिल्ली/बडोदा



बडोदा संस्थानचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी अनमोल मदत केली. महाविद्यालयीन शिक्षण आणि परदेशातील उच्च शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली होती. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य सामाजिक परिवर्तनासाठी लोकसेवेसाठीसर्व देशाला प्रेरणादायी कार्य आहे. त्यांच्या सामाजिक सुधारणाच्या कार्यात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे ऐतिहासीक योगदान होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारच्या वतीने महाराजा सयाजीराव गायकवाड यांना मरणोत्तर भारतरत्न किताबाने गौरविण्यात आले पाहिजे यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

बडोदा येथे 107 व्या संकल्प दिनानिमीत्त संकल्पभुमि सयाजी गार्डन बडोदा येथून जवळ असणा-या सुर्या पॅलेस सयाजी गंज बडोदा येथे संकल्प से संविधान या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ना.रामदास आठवले होते. रिपब्लिकन पक्षाच्या वतीन आयोजित या संकल्प से संविधान कार्यक्रमात बडोदा संस्थानच्या राजमाता श्रीमंत राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांचा ना. रामदास आठवले यांच्या शुभहस्ते ताम्रपत्र देवुन गौरव करण्यात आला. यावेळी राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अत्यंत आपुलकीचे संबंध होते. दोघांमध्ये अनेक पत्र व्यवहार झालेला बडोदा संस्थानात जपून ठेवलेला आहे.

गोलमेज परिषदेत जेव्हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उत्कृष्ट भाषण केले. त्या गोलमेज परिषदेत महाराजा सयाजीराव गायकवाड सुध्दा होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण ऐकल्यानंतर त्यांना खुप अभिमान वाटला. त्यांनी लंडनमधील सर्वात मोठया हॉटेलमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवासाठी मेजवाणी ठेवली होती. त्या मेजवाणीत त्यांनी लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या पध्दतीने गोलमेज परिषदेमध्ये भाषण केले ते सर्वांना भारावुन टाकणारे होते. त्याची आठवण राजमाता शुभांगिनी राजे गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितली.

# "भिकारी पाठवू नका", पाकिस्तानला सौदी अरेबियाची इशारावजा धमकी

वृत्तसंस्था
रियाध

धार्मिक तीर्थयात्रेच्या नावाखाली येणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांच्या वाढत्या संख्येबाबत सौदी अरेबियाने पाकिस्तानला इशारावजा धमकी दिली आहे. धार्मिक तीर्थयात्रेच्या नावाखाली देशात येतात आणि नंतर भीक मागतात, असं सांगत सौदीच्या अधिकाऱ्यांनी पाकिस्तानला त्या नागरिकांना थांबवण्यासाठी त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केलं आहे. मात्र, असं न झाल्यास पाकिस्तानी उमराह आणि हज यात्रेकरूंवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात, असा इशारा सौदी अरेबियाने दिला आहे.

सौदी अरेबियाने पाकिस्तानला इशारा दिल्यानंतर पाकिस्तानने स्पष्टीकरण देत उमरा प्रवास करणाऱ्या ट्रॅव्हल एजन्सींचे नियमन करण्यासाठी उमरा कायदा आणण्याची योजना असल्याची माहिती देण्यात आली आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी सौदीचे राजदूत नवाफ बिन सईद अहमद अल-मल्की यांना आश्वासन दिलं की, "कठोर उपाययोजना अंमलात आणल्या जातील." दरम्यान, यासंदर्भातील वृत्त पीटीआयच्या हवाल्याने एका इंग्रजी दैनिकाने दिलं आहे.

### पाकिस्तानी भिकाऱ्यांमुळे सौदी अरेबिया त्रस्त

*धार्मिक तीर्थयात्रेच्या नावाखाली पाकिस्तानी नागरिक सौदी अरेबियातील विविध शहरात येतात आणि नंतर भीक मागतात, अशा लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सौदी अरेबियाने याबाबत चिंता व्यक्त केली आहे. तसेच याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात पाकिस्तानला इशारावजा धमकी सौदी अरेबियाने दिली आहे. दरम्यान, पाकिस्तानी भिकाऱ्यांची संख्या सौदी अरेबियामध्ये वाढल्यामुळे सौदी अरेबिया त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.*

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!




स्वरा मनोहर पाटेकर
- शुभेच्छुक -
मम्मी-पप्पा, आजी-आत्या, मावशी-काका, मामा -मामी